

# एक डाव नियतीचा...

पुर्वा राऊत

# एक डाव नियतीचा...

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# एक डाव नियतीचा...

(कादंबरी)

लेखिका

## पुर्वा संजय राऊत

# एक डाव नियतीचा... (कादंबरी)


## लेखिका: पुर्वा संजय राऊत

पत्ता : मु. पो. एडवन (सफाळे), ता.जि. - पालघर
पिन कोड - ४०११०२
मोबाइल - 7276184340
ई-मेल - inforaut99@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.

**प्रकाशन : ७ सप्टेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## ***थोडंसं काही "एक डाव नियतीचा..."च्या निमित्ताने***

तशी लहानपणापासून वाचनाची फार आवड... काही दिसलं तर हातातलं काम टाकून ते चाळत बसायची. आजवर खूप पुस्तके वाचली. पण स्वतःचे काहीतरी लिहून प्रकाशित करता येईल, असा विचारही कधी मनाला शिवला नव्हता. पण एके दिवशी " पेराल तसं उगवेल " असं काहीतरी वाचनात आलं आणि मनात नकळत लिहिण्याची भावना स्पर्शून गेली. "एक डाव नियतीचा..." हे माझं पहिलं पुस्तक. खरं तर आमच्यासारख्या नवख्या लेखक आणि कवींना ई-साहित्य प्रतिष्ठानाने या स्पर्धात्मक जगात आपले पाऊल ठेवायला मार्ग दाखवला, म्हणून मी सुनीळ सामंत सर आणि ई - साहित्य प्रतिष्ठान यांच्या टीमचे आभार मानते.

या पुस्तकामागे अनेकांचे कष्ट आहेत, मेहनत आहे. मी एकटी याची हक्कदार नाही. माझी लहान बहीण कु. भाविका संजय राऊत, हिने माझ्या स्वप्नांना वाट दाखवून माझ्या कल्पनेला वास्तवात आणण्यास मला वेळोवेळी मदत केली. त्यामुळे तिचे आभार मानल्याविना माझे मनोगत पूर्ण होणे शक्य नाही. माझ्या या लिहिण्यामागे माझे आई-वडील, माझे भाऊ-बहीण, माझे गुरुजन या सगळयांचा पाठिंबा आहे. जितकी नावे घ्यावी तेवढी कमीच आहेत, या

सगळयांचे मी आभार मानते. शालेय गुरुजन, शाळेतील वाचनालय यामुळे नकळत मी पुस्तकांकडे आकर्षित झाली आणि त्यातूनच आज लिहिण्याची प्रेरणा मला मिळाली. माझ्या या यशात माझ्या आई वडीलांचा, भावा-बहिणीचा, शाळेतल्या गुरुजनांचा आणि माझ्या क्लासेसच्या शिक्षकांचा, मित्र-मैत्रिणींचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच मी आजवर घडली आहे आणि अजूनही घडत आहे. म्हणून या सगळयांची मी आजन्म ऋणी राहील.

तसं बघायला गेलं तर, मी बारावीत असताना कविता लिहायला सुरुवात केली, पण ती कधी प्रसिद्ध करण्याच्या भानगडीत पडली नाही. पण जसं वाचन वाढलं तसं पदवीच्या ३ ऱ्या वर्षात वाटू लागलं, आपणही काहीतरी लिहावं. म्हणूनच, "एक डाव नियतीचा..." हे माझे पहिले पुस्तक. आज ई- साहित्य प्रतिष्ठानाच्या मदतीने हे पुस्तक तुम्हां वाचकांना भेट म्हणून देताना मला आनंद होत आहे. तरी आपण सर्वांनी याचा स्वीकार करावा, ही नम्र विनंती.

- पुर्वा संजय राऊत.

# पुर्वा संजय राऊत.



**जन्म : २८ डिसेंबर १९९९**

माझे बालपण सफाळे (पालघर) येथील एडवन या गावी गेले. माझे दहावी पर्यंतचे शिक्षण विद्याभवन एडवन या शाळेत झाले. सुदैवाने, आमच्या शाळेत वाचनालय होते आणि म्हणूनच माझ्यातला वाचनाप्रतीचा जिव्हाळा निर्माण होण्याचे सगळे श्रेय या वाचनालयाला जाते. पाचवी पासून दहावीपर्यंत हवी ती सारी पुस्तके, कथा-कादंबऱ्या, काव्यमाला, वैज्ञानिक पुस्तके सगळं काही वाचनात आलं. माझे दहावीनंतरचे शिक्षण अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय वसई (पालघर) येथे सुरु असून मी वाणिज्य शाखेच्या अंतिम वर्षाला आहे. ययाती, श्रीमान योगी, छावा, समथिंग, मास्टर माईंड, दुनियादारी ही माझी आवडती पुस्तके. वि.स. खांडेकर, रणजित देसाई, सुहास शिरवाळकर, सिडनी

शेल्डन हे माझे आवडते लेखक. सुहास शिरवाळकर यांची जवळपास सगळीच पुस्तके मी एका बैठकीत वाचून मोकळी झाली आहे.

मी खरंच मनोमन मानते, "वाचनाने बुद्धी सुधारते, विचारशक्तीला बळ येते, विचारांची खोली वाढते आणि माणसाला प्रत्येक वेळी समस्येला सामोरे जायला पुस्तक आणि त्यातून घेतलेला धडा नेहमी बळ देते." कोणीतरी म्हटले आहे ना... " पुस्तक हा माणसाचा खरा गुरु अन खरा सोबती. " ते काही उगाच नाही.

एक डाव नियतीचा...

पुर्वा संजय राऊत.

पत्ता : मु. पो. एडवन (सफाळे)

ता.जि. - पालघर

पिन कोड - ४०११०२

मोबाइल - 7276184340

ई-मेल - inforaut99@gmail.com

# पुस्तकाची ओळख :

नियती... कधी कोणी हिचं भाकीत करू शकत नाही. आजवर कित्येक लोक असे असतील ज्यांनी नियतीच्या चक्रात फसून मरण जवळून अनुभवलं असेल, काही असेही असतील ज्यांच्यावर नियती मेहरबान झाली असेल. पण नियतीचा खेळलेला प्रत्येक डाव, कधी कोणावर कसा उलटू शकेल याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही.

अशीच नियतीने साधलेल्या डावात अडकलेली अनघा आणि तिची कथा घेऊन मी तुमच्यासमोर आली आहे. या कथेतील पात्रे तुम्हांला तुमच्यासारखी भासतील, एका टप्प्यावर तुम्ही तिथे स्वतःला रिलेट कराल... नियतीने साधलेल्या डावात अनघाच्या जीवनाला आलेली कलाटणी, नियतीने कधी मेहेरबान होऊन तर कधी अगदी दुष्टपणे

अनघाच्या जीवनाशी खेळलेल्या डावात अनघा अपयशी ठरते कि नियतीला माघार घ्यायला लावते... ते तुम्हाला कादंबरी वाचताना कळेलचं. पण नियतीने मांडलेल्या डावात अनघाला जडलेला आजार, त्यात तिने उचललेले पाऊल, नियतीच्या फटक्याने तिला सहन कराव्या लागलेल्या मरणयातना असे अनेक हृदयद्रावक प्रसंग यात रेखाटले आहेत. वाचताना डोळ्यात पाणी येईल, मध्येच अनघासाठी हुरहूरही लागेल, आणि शेवट काय असेल याची उत्सुकता नक्कीच वाचकांना राहील, अशी सान अपेक्षा. आपल्या अभिप्राय - सूचना जरूर कळवा, ही छोटीशी विनंती.

# ***<u>अर्पणपत्रिका</u>***

*ज्यांनी मला जन्म देऊन सुसंस्काराचे धडे दिले अश्या माझ्या आई-बाबांसाठी...*

*ज्यांनी मला आलेल्या संकटाशी सामना करायला शिकविले अश्या माझ्या सर्व गुरुजनांसाठी...*

*ज्यांनी माझ्यातली कला ओळखून मला लिहिण्यासाठी उत्तेजन दिले अश्या माझ्या बहीण-भावांसाठी...*

*आणि माझ्या सर्व हितचिंतकांसाठी...*

*माझे हे पहिले - वहिले पुस्तक समर्पित !*

*~ पुर्वा राऊत !*

# एक डाव नियतीचा...

पुर्वा संजय राऊत.

एक डाव नियतीचा... ही कथा काल्पनिक आहे. त्यांतील व्यक्ती, स्थळ, प्रसंग हे सर्व काल्पनिक असून वास्तवातील कोणा व्यक्ती वा स्थळाशी त्यांचे साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग ठरेल.

# १

हां... ती थोडीशी वेंधळी अन थोडी मॉडर्न अशी. नाव तिचं अनघा. डोळे ते काळेभोर अन कुरळया कुरळया केसांची आणि सुडौल अश्या बांध्याची ती. पीठासारखी गोरीपान अन भन्नाट अश्या डोक्याची धनी. पाहूनच मोहित होण्यासारखी स्वर्गातली अप्सरा जणू काही. बघताच तिच्यावर मोहित होण्यासारखी अन त्यातच तिला लाभलेली ती सुरेल आवाजाची दैवी देणगी, यामुळे रुपाला चार चांद लागलेच असं समजा. तशी तिच्या स्वप्नांशी तिची गट्टी जमली होती, व्हायचे होते तिला गायक. ओळखला होता तिने तिचा तो गायनाचा कल, कॉलेजमधून बाहेर पडता पडता त्या स्नेहसंमेलनचा दिवस तिनं गाजवला होता. तो टाळयांचा होणारा कडकडाट आणि मिळालेली ती कौतुकाची पाठीवरील थाप... यामुळे, अनघा अगदीच भारावून गेली होती. अन कळत नकळत का होईना, पण तिचा गाण्याकडला तो कल वाढत होता.

त्या परिक्षेनंतर मिळालेल्या फावल्या वेळात तिने गायकीच्या शिकवणीही लावून घेतल्या होत्या तिच्या पप्पांच्या मदतीने. अन हा वेळ तिचा अगदी रमत अन गाण्यात तल्लीन होऊन जात होता. तसं तिला गायक व्हायचं होतं, पण हा छंद होता. यात करिअर करायचंय कि नाही हा सर्वस्वी तिचा स्वतःचा प्रश्न होता. त्याबद्दल तिला स्वातंत्र्य होते.

अगदी लाडात वाढलेली, तिच्या पप्पांच्या कन्याप्रेमात जगलेली, अंगावर कधी पाच बोटंही लावली नव्हती तिच्या बाबांनी. हो ना... बाबाच तिचं सगळं विश्व होतं. तिचे पप्पा म्हणजे तिचे बाबा, तिची आई, तिची ताई अन मैत्री सुद्धा त्यांच्याशी. एकंदरीत बाबा हाच तिचा आधारस्तंभ होता.

तुम्ही म्हणाल तिची आई, आई कुठं गेली? अरे हो, या प्रश्नाचं उत्तर तिलाही आजपर्यंत ठाव नव्हतं. लहानपणापासून बाबांनी कधी तिला तिच्या आईची कमी भासवून दिली नव्हती, जीवापाड जपायचे तिला. अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे. काय हवं नको तिला... ते सगळं सगळं आरवच बघायचा. आरव म्हणजे अनघाचे पप्पा. कॉर्पोरेट मध्ये आरव HR मॅनेजरच्या पदावर होता. सगळं काही व्यवस्थित चाललं होतं.

अनघाला मधेच बालपणात प्रश्न यायचेच. पप्पा माझा जन्म कसा झाला, जसं तीच वय तसं आरव तिच्या मनाच्या समजुती काढायचा. अगदी ३-४ वर्षाची असताना तिने असे काही विचारले तर आरव म्हणायचा, " तुला ना, एका सूंदर परीने माझ्याकडे रात्री या गादीवर आणून ठेवलं अन सकाळ झाली तेव्हा मी तुला बघितलं आणि इतकं वाढवलं. अगदी लहानाची आता तू मोठी झालीस ना... माझी सानुली परी."

जशी ती शिकती सवरती झाली १५-२० वर्षाची. पुन्हा तिच्या मनात तोच प्रश्न. अन आरवही नेमका तयारीत असायचा तिला उत्तर देण्यासाठी. एकदा सकाळी नाश्ता करता करता सहज तिने एक नजर फिरवली सभोवार अन आरवला आवाज दिला.

" डॅडु, एक विचारू का?? " जरा घाबरत चाचपडत विचारलं तिने आरव ला.

" हा बाळा, विचार ना, काय झालं? " आरव अगदी तिला थोपटत म्हणाला. पण आतून त्यालाही भीती वाटली. असं काय विचारणार आहे ही, म्हणून तोही आतून दुःखी कष्टी

झाला. पण समोरून तिला जाणवू नये, म्हणून त्याने वरवरचं स्वतःला सावरले.

"हा, डॅडु मी म्हणत होते, मी आहे, तुम्ही पण आहेत, मग मम्मा कुठं आहे माझी?? "

अनघाने सरळ विषयला हात घातला होता अन इथे आरवच्या मनात एक चलबिचल सुरु झाली होती.

काय करावं, कस सांगावं कळत नव्हतं, त्याच्या डोक्याचा फार भुगा होण्याची वेळ आली होती त्या १-२ मिनिटांत. अन त्याचं सुदैव म्हणावं कि, अनघाचं दुर्दैव कळत नाही. बोलायला आरव तोंड उघडणार तेवढ्याच त्याच्या फोनची रिंग वाजली, ट्रिंग ट्रिंग, ट्रिंग ट्रिंग... आरव भरल्या नाश्त्याच्या ताटावरून उठला अन फोन कडे धाव घेतली, स्क्रीन वर नाव झळकत होत त्याच्या "निशांत सर"चं. बहुदा, त्याच्या बॉसचा फोन आला होता अन त्यांचं काहीसं संभाषण चालू झालं.

"हॅलो सर, गुड मॉर्निंग " आरवनं फोन वर त्याच्या बॉसला विश केलं.

पलीकडून त्याच्या बॉसचा आवाज आला,

" गुड मॉर्निंग आरव, I'm here to inform you that today you have to submit that PPT which was decided to submit after two days. It's so urgent, just start your work and submit it fast"

डेडलाईन जवळ आली आहे अन कामाचा वेग वाढव, असं सांगून निशांतने फोन ठेवला.

एव्हाना, अनघानेही हे सगळं काही ऐकलं असावं, अन तिच्या डॅडच्या PPTच्या सबमिशन मध्ये ती तिचा तो प्रश्नही विसरून गेली.

आरवला आता जरा जोरानं कामाला सुरुवात करायची होती. त्यानं त्याचा ब्रेकफास्ट आवरता घेतला अन अनघाला गुड बाय बोलून त्याच्या रूम मध्ये गेला.

त्याचं लक्ष विचलित झालं नव्हतंच मुळी, तिने तो सकाळच्या ब्रेकफास्टच्या वेळी विचारलेला प्रश्न अजूनही तिच्या आवाजात त्याच्या कानात घुमघुमत होता. पण बॉसचा

ऐन वेळी फोन अन त्याची ती उडालेली धांदल बघून अनघानेच विषयांतर केले होते. मग तो बदल लक्षात घेऊन, आरवनेही तिला तिच्या क्लासला उशीर होईल म्हणून आवरतं घ्यायला सांगून तो PPTसाठी रूम मध्ये आला होता.

यावेळी देवानं वेळ मारून नेली होती की दैवानं, त्याला उमजत नव्हतं. पण वेळ मारून नेली होती, यातच त्याने सुटकेचा निःश्वास सोडला होता. पण कधीतरी ही वेळ येईलच ना... तेव्हा काय करायचे, कसं सामोर जायचं अनघाला त्याला कळतंच नव्हतं, अन त्याच विचारात गर्क असताना त्याच्या मोबाईलने परत त्याला त्याच्या विश्वातून वास्तव्यात आणले होते. त्याच्या बॉसने त्याला PPTसाठी आवश्यक मुद्दे अन अजून काही माहिती मेल केली होती. आरवही आता झपाझप कामाला लागला होता, आज डेडलाईन जवळ आल्यामुळे बॉसने त्याला WORK FROM HOME ऑफर केलं होतं. दुपारच्या १ वाजेच्या सुमारास, अनघा तिच्या क्लास वरून घरी आली, अन रूम मध्ये जाऊन डोकावले तर आरव अजून त्या PPT च्याच मागावर होता. तिने ती धडपड अन त्याच्या डोक्यावरचे टेन्शन ओळखले होते.

किचन मध्ये आल्यावर त्या कामवाली मावशी येऊन भाजी अन चपात्या करून गेल्या होत्या. तिने ती भाजी ओव्हन मध्ये गरम करायला ठेवली अन आरवला जेवणासाठी आग्रह करायला गेली. आरव अजूनही त्याच्या कामातच होता. पण जेवणाची वेळ टळून जाईल अन अनघा वाट बघतेय, तिचा मूड ऑफ नको व्हायला, म्हणून त्यानं त्याचं आवरत घेतलं अन तो डायनींग टेबल वर आला. एव्हाना, अनघा नं दोघांसाठी वाढलं होतं, तिला विचारायचं होतं, पण आरव चं त्या PPT बद्दलच टेन्शन तिला तिचं मन आवरायला भाग पाडत होत. आरवनं तिच्या क्लास बद्दल विचारणा केली अन नंतर इथल्या तिथल्या गोष्टी झाल्या नंतर आरव पुन्हा आपल्या रूम मध्ये येऊन बसला. त्याचंही डोकं जड होत होतं. कामाच्या व्यापामुळे नव्हे, तर अनघाने विचारल्या त्या सकाळच्या प्रश्नामुळे. तो सावरीत होता स्वतःला. अन अचानक त्याच्या त्या विचारांमुळे तो खोल विचारात गेला अन त्या भूतकाळात जाऊन त्याच्या अन तिच्या आठवणीत रमून गेला क्षणासाठीच.

त्याचं अन तिचं ते अरेंज मॅरीज. ती म्हणजे निशा, आरवची पत्नी. घरच्यांच्या सहखुशीनं अन संमत्तीनं झालेलं

त्यांचं लग्न. अग्नीला साक्ष देऊन सात फेरे घेऊन ते दोघे लग्न गाठीत बांधले गेले होते या जन्मासाठी. सगळं काही मस्तच चाललं होतं दोघांचंही. अन १-२ वर्षांत त्यांच्या घरी पाळणा हलणार, अशी हलकेच बातमी पसरली. सगळे खूप खुश होते, आरव आणि त्याचे आई-बाबा अन तिचे आई-बाबाही. पण ती, ती मुळीच खुश नव्हती, कारण होतं असं की तिला तिच्या करिअर वर जास्त फोकस्ड व्हायचं होतं आणि इतक्या लवकर तिला मातृभार लादून घ्यायचा नव्हता.

सगळ्यांनी खूप समजावलं, अगदी आरवने तर चक्क लोटांगण घालायचे बाकी होते. पण दगडावर डोके आपटून काय मिळणार, आपल्या डोक्याचं रक्तच फक्त, अन ते रक्त पाहून दगडाला जर पाझर फुटला, तर काय तो दगड का? सगळ्यांनी तिला समजावून झालं. सासू म्हणा, सासरे बुवा, बाबा अन राहता राहिली ती आई तिची. आईने चालवलं तिचं वज्रास्त्र अन ती घायाळ झाली, भावुक झाली अन निर्णय या सगळ्यांच्या बाजूनं लागला.

काय माहित काय होतं भाळी तिच्या अन आरव च्या. सकाळी ऑफिसला गेल्या गेल्या तिच्या बॉसने तिला बोलावून

घेतलं अन तिच्या प्रमोशनसाठी एक क्लायंटचा प्रोजेक्ट सोपवला.

"निशा, हे तुझं ध्येयं आणि ही तुझी वाटचाल करण्याची योग्य संधी " तिचा बॉस खुशीत बोलला.

निशा थोडीशी गोंधळून गेली. पण करिअरसाठीच तर लढलो ना काल आपण, मग आज का माघार घ्यायची.

तिने थोड्या दबक्या आवाजातच "डन सर" असे सांगून निरोप घेतला.

स्वतःच्या केबिन मध्ये जाऊन, आरवला टेक्स्ट मेसेज केला. थोडंसं महत्वाचं बोलायचं आहे तुझ्याशी, फ्री कधी होशील?

त्याच्याही रिप्लाय त्यावर... अगं, घरी बोलूया ना कामावरून आल्यावर निवांतपणे.

तिने पुन्हा मेसेज केला... " आरव, घरी नाही रे... बाहेर भेटू या ऑफिस सुटल्यावर, थोडं महत्वाचं आहे.'

त्याला माहित होता तो हट्टी स्वभाव निशाचा. आणि तिच्या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेता त्याने तिला मेसेज केला. "हा चालेल... त्या सन कॅफे मध्ये भेटू या ५:०० वाजता. "

तिने 'एक प्रॉब्लेम सुटला'' असं म्हणून एक सुटकारा सोडला. पण आता महत्वाचं होतं ते म्हणजे आरवला सामोरं जाऊन त्याच्या नजरेला नजर देऊन त्याला ही बातमी सांगणं. थोडंसं जास्तीचं दडपण तिच्या मनावर आलं होतं. कश्यातही तिचं लक्ष लागत नव्हतं. एकदाचे ५ वाजले, ऑफिस सुटलं आणि लगबग करत ती सन कॅफे मध्ये येऊन पोहचली अन आरवला कसं सामोरं जायचं, याच विचारात मग्न होती.

तेवढ्यात आरव आला. त्या कोपऱ्यात नजर टाकली तर तिची चर्या विचारात गढून गेली होती. तिची मस्ती करण्यासाठी त्याने मुद्दामहून तिची फिरकी घ्यायचे ठरवले. "काय मॅडम कोणत्या विचारात हरवलात, कोणी राजकुमार कि काय? "

एव्हाना ती सावरून गेली होती. अन लागलीच वेटरला बोलावून तिनं १ सॅण्डविचं अन २ कॉफी मागविला होता. सरळ विषयाला हात घालावा असा विचार करीत असताना, आरवने अतिशय प्रेमाने तिचे हात आपल्या हातात घेतले, उद्देश एकच

कि तिच्या मनावरचं ताण, अन आलेला क्षीण थोडासा कमी व्हावा. पण ती जरा जास्तच अवघडून बसली अन बोलायला सुरुवात केली.

"आरव, एक प्रॉब्लेम झालाय." नजरेला नजर देण्याच्या प्रयत्नात ती बोलली.

" हा... बोल ते मला क्षणात कळलं, तुझ्या चेहऱ्यावरची उदासीनता त्यातूनच समजतंय कि काहीतरी गडबड आहे" आरव नं त्याची सगळी निरीक्षणे क्षणात तिच्या समोर मांडली.

निशा दबक्या स्वरात म्हणाली, " अरे, आजच माझ्या बॉसने मला एक प्रोजेक्ट दिलाय अन त्यात जर यश आलंच तर डायरेक्ट मोठ्या पदावर बढती पण मिळणार, असं आश्वासन दिलंय त्यांनी. अन मी त्यांना हो बोलून आली आहे."

उद्यापासून प्रोजेक्ट चालू होईल, म्हणून मला वाटतं की आपण गर्भपात करून, हा चान्स नंतर घ्यावा. "

आरव, त्याचं काय झालं ते विचारूच नका. अक्षरशः गळून, खचला होता तो. निशाचे हे वाक्य ऐकून त्याची दातखिळच बसली होती. डोळयांत आसवे जमा झाली होती.

अन तेवढ्यात, ट्रिंग ट्रिंग... त्याच्या फोनची रिंग वाजली. त्याच्या निशांत बॉसचा फोन होता. पलीकडून आवाज आला,

"काय आरव... how is the work? "

"हा सर... होतंय होतंय.. थोड्याचं वेळात तुम्हाला मी PPT मेल करतो"

आरवच्या आवाजात तो नम्रपणा होता, अजूनही तो त्या धक्क्यातच होता. पण जसा बॉसचा फोन आला, त्याने स्वत:ला सावरलं. अन तो पुन्हा PPT कडे वळला. ती जखम अजून ओली होती त्याच्या हृदयावर. २०-२२ वर्षे उलटून गेली असावी बहुधा, तरीही आठवण आली की आरवचे डोळे आसवांनी भरून येतात.

तेवढ्यात अनघा येते, ती जणू काही निशाचीच प्रतिकृती. हुबेहूब तिच्यासारखी, पण मिळत्या जुळत्या गोष्टी होत्या तिच्या आरवसारख्या. आरवनं त्याच्या गालांवर ओघळलेली आसवे तिच्या नकळत टिपून घेतली हातरुमालाने.

अनघा आरव कडे पाहून " डॅडु, बागेत जायचं आहे, येतात का माझ्या सोबत " म्हणाली.

पण तिला माहित होतं त्याचं PPT अजून संपल नव्हतंच.

तो नाही बोलायच्या आधीच अनघा म्हणाली,

" ओके, You carry on your PPT, मी एकटी जाऊन येते."

"बेटा, सांभाळून जा...", आरव एवढंच काही बोलू शकत होता यावेळी.

अनघा थोडीशी रागातच होती, खरे तर राग आला होता तिला तिच्या डॅड्डीच्या बॉसचा. म्हणे काय आजच PPT हवी होती त्याला.

तिलाही अनेक प्रश्न होते, त्याची सविस्तर उत्तरे हवी होती आज तिला. सारखे बोचत होते ते सगळे प्रश्न तिच्या जीवाला. जशी समजदार होत होती, तसे तिला ते गूढ खूपच भीतीदायक वाटत होते. त्याच विचारांच्या तंद्रीत असतानाच ती बागेच्या वाटेवर एक व्यक्तीवर जाऊन धडकली. सॉरी बोलायच्याही ती तंद्रीत नव्हती. कारण ती विचारांच्या इतक्या खोलवर जाऊन पोहचली होती, कि तिला उत्तर हवे होते, तिच्या शंकांचं निरसन हवं होतं तेही आजच्याच दिवशी.

ज्या व्यक्तीवर ती धडकली होती, ती ४०-४५ वर्षांची एक गोरीपान बाई होती. पण अनघा त्यावेळी इतकी संभ्रमीत झाली होती की, तिचा तिच्या नकळत कुणाला धक्का लागतोय हेही तिला कळत नव्हतं. त्या बागेतल्या बाईंने तिच्या त्या कपाळावरील आठ्या अगदी व्यवस्थित निहारल्या होत्या अन तिच्या माफीची अपेक्षा न ठेवता त्या सहजपणे आपल्या कामाला निघून गेल्या. पण ती मुलगी, तिचा तो स्वभाव अन त्यावर उमटलेल्या त्या चिंतेच्या असंख्य अश्या रेघोट्या. देव जाणे का, पण काहीसं आपलेपण जाणवत होतं तिला पाहिल्यापासून नेत्राला. हो, ती बागेत अनघाशी झालेल्या टक्करींन नेत्राच्या जीवाला अगदीच कासावीस करून सोडलं होत. आज बिछान्यावर पडल्या पडल्या तिला काही झोपच येत नव्हती. सारखं डोळ्यांसमोरून बागेत झालेली घटना सरसर पुढे सरकून येत होती. अन अचानक बऱ्याच उशिरा तिचा डोळा लागला.

अनघावर तसा काही फार असा परिणाम झाला नव्हता त्या घटनेचा. आपल्या रुटीनचा एक भाग म्हणून तिनं त्याचा विचार तिथेच सोडला होता. नेत्रासारखं "काही खास" असं

तिला वाटलं नव्हतंच, पण म्हणतात ना... दैव डाव मांडतं अन आपलं कर्म आपल्याला त्यात ओढून घेतं. पुढे काय वाढून ठेवलं आहे याचा अगदी चुटकीभर देखील थांगपत्ता नव्हता दोघीनाही.

सकाळ झाली, सूर्य डोईवर आला अन सगळयांची दिनचर्या सुरु झाली. एकीकडे अनघा तिच्या डोक्यात त्या गहन प्रश्नाचे काहूर माजले होते, कधी एकदा तिच्या डॅडूची अन तिची नाश्तासाठी भेट होते अन कधी तिला समाधानकारक अशी तिच्या प्रश्नाची उत्तरे मिळतात, असे तिला झाले होते. आरव... कालच्या त्या अर्जन्ट PPT मुळे त्याच्या सगळया दिवसाची पुरेपूर बँड वाजली होती. पण या कामाच्या व्यापात तो कालचा अर्धवट राहिलेला अनघासोबतचा मुद्दा मुळीच विसरला नव्हता. पण थोड्या फार अश्या तयारीनिशी तो आज सकाळी फ्रेश होऊन नाश्ता करण्यासाठी हजर झालाच. मनोमनी देवाची विनवणी करत होता.

त्याला पाहताच मोठी स्माईल देऊन अनघाने गुड मॉर्निंग असे विश केले. तिची ती स्माईल बघून क्षणभर आरवचा जीव सुखावला होता, त्याला वाटले 'रात गयी बात गयी ' असंच

काहीतरी झालं असावं. पण अनघा... ती अनघाच होती. विस्मरण ह्या मानवजातीला मिळालेल्या शापातून बऱ्यापैकी तिची सुटका झाली होती. सहसा मुद्द्याच्या गोष्टी तिच्या डोक्यातून कधी निसटत नसतच. मग आढेवेढे घेता घेता... अनघाने विचारलेच.

" डॅड, मम्मा कुठे गेली? आपण फक्त दोघेच का आहोत? माझ्या बालपणातील एकाही फोटो मध्ये मम्मा का नाही?? "

आरवला यावेळी विचारताना अनघाच्या आवाजात अगदी ओलावा आला, तिचा गळा दाटून आला आणि मन कासावीस झाले... पण तरीही जसा चातक पहिल्या पावसाची अगदी आतुरतेने प्रतीक्षा करत असतो अगदी त्याच टोकाच्या प्रतीक्षेने अनघा आरव कडे डोळे निरखून उत्तराची अपेक्षा करीत होती.

आरव मनापासून तयार होताचं. म्हणावं तर अगदी अनघा २-४ वर्षाची असल्यापासूनच त्याने स्वतःला या गोष्टीसाठी तयार केले होते. आज नाहीतर उद्या कधीतरी या गोष्टीला त्याला सामोरे जावे लागणारच होते. अन तसंच काहीसं आज झालं, देवानं घडवून आणलं आणि आरवला त्या धर्मसंकटात

उभं केलं. आरव जरी खूप वर्षांपासून या गोष्टीसाठी तयार होत होता... तरी सुद्धा आज चक्क पहिल्यांदा अश्या प्रकारचे प्रश्न अनघाच्या तोंडून ऐकताना त्याचा जीव तुटला होता... तो खचून गेला होता. क्षणभरासाठी त्याचा त्याच्यावरचा ताबा सुटला होता. पण अनघाला समोर पाहिल्यावर... त्याचे गळालेले अवसान एकवटून त्याने धीर धरत तिला सांगण्याची तयारी दर्शविली. अनघा अगोदरपासूनच यासाठी आतुर होती, अन आरवचा मिळालेला तो होकार तिला बरंच सुख यावेळी देऊन गेला, पण तिला ठावं नव्हतंच कि पुढे तिच्या वाटेला किती दुःख मांडून ठेवले आहे.

आरवने टेन्शनमध्ये चक्क टेबलावरचा एक मोठा पाण्याचा ग्लास आपल्या शरीरात रिचवला. अन थोडा वेळ विचार करून अनघाला सगळं काही सांगण्यास सुरुवात केली.

" बाळा, जशी निशा प्रेग्नेंट झाली होती, घरी सुखाचे झरे वाहू लागले होते अन त्यात भर म्हणजे निशाने तिच्या करिअरला बाजूला सारून तुला या जगात आणायच्या निर्धारावर शिक्कामोर्तब केले होते. मला आठवते, तिच्या त्या आईसक्रिम, चॉकलेट आणि चक्क त्या आंबट कैरी अन

चिंचेचे डोहाळे पुरे करण्यात माझ्यासोबत सगळ्यांचीच धावपळ उडाली होती. सगळे जण तिच्याकडे विशेष लक्ष पुरवीत होतेच. तीही खुश होती. अश्यातच नऊ महिने लोटलेही. अन तो दिवस आला... तिला प्रसववेदना सुरु झाल्या, ताबडतोब हॉस्पिटलमध्ये रवाना केलं. मी मिटिंग मध्ये बिझी असल्याने मला यायला थोडा उशीर झाला. अन निशा सारखी माझ्याच नावानं ओरडत होती, मी तिला त्यावेळी गरजेचा होतो. अखेर वेळेवर नसेना... पण एकदाचा पोहचलोच आणि तिला वॉर्ड मध्ये दाखल केले. तिच्या आईची आणि माझ्या आईची प्रार्थना सुरु झाली देवाकडे... डिलिव्हरी नीट पार पडावी, यासाठी.

अर्ध्या तासाने डॉक्टर बाहेर आले अन ते जे काही म्हणाले... त्याने माझ्या आणि जवळ जवळ सगळ्यांच्याच पायाखालची जमीन सरकली. "आई आणि बाळ यातील फक्त एकालाच वाचवू शकतो... पण आई पेक्षा बाळाला वाचविण्याचे चान्सेस जास्त आहेत. निशाची कंडिशन जास्त हलाखीची असल्याने तिचे काही सांगता येत नाही. "

" ऐकून मी सुन्न झालो, माझा समतोल ढासळला अन शून्यात नजर ठेवून फक्त विचार करू लागलो, पण डॉक्टरांच्या बोलण्यामुळे भानावर आलो... परिस्थितीची जाणीव करून घेतली अन डॉक्टरांना "काहीही झाले तरी माझ्या निशाला वाचवा, एवढेच बोल माझ्या तोंडातून फुटले." हात जोडून गणरायाला शरण गेलो... माझी निशा मला परत दे... अन हे बोलता बोलताच आरवचे डोळे पाण्याने भरून आले. अनघाला मिठीत घेऊन त्याने त्याच्या अश्रूंना वाट करून दिली. अन पुन्हा स्वतःला सावरून तिला सांगू लागला...

या कठीण परिस्थितीत निभाव काय लागणार हे फक्त देवाला ठाव होते, आम्ही फक्त काय ते प्रार्थना करू शकत होते. सगळ्यांचा जीव कासावीस झाला होता. अखेर एक - दीड तासानंतर डॉक्टर आले. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांची निराशा दिसून येत होती. परिस्थितीचा मागोवा घेत मी डॉक्टरांकडे पोहचलो. पाठून एक नर्स येऊन त्यांनी "तुला" आमच्याकडे सोपविली अन अभिनंदन केले. तुला पाहून आमच्या सर्वांचा जीव भांड्यात पडला... क्षणभरासाठी सगळे दुःख विसरून तुला निहारू लागलो.

पण तुझ्या त्या डोळ्यांचे निरीक्षण करताना अचानक निशा आठवली. अन डॉक्टर कडे केविलवाण्या नजरेने बघितले.

डॉक्टर म्हणाले, "मिस्टर आरव, We are very sorry, we couldn't save to your wife."

ज्याची भीती होती तेच घडलं होतं. देवानं आमच्या बागेतलं एक फुल काढून त्या जागी दुसरं फुल ठेवलं होतं. घरी जाताना वाटेत एकच विचार मनी घोळत होता... निशा.. माझी निशा देवानं माझ्यापासून दूर नेली... तिच्यासोबत जगलेलं ते अख्ख आयुष्य त्या २ मिनटात माझ्या डोळ्यासमोर झरझरुन गेलं.

त्या धक्क्यातून सावरायला चक्क ४-५ महिने उलटले. तोपर्यंत तुला तुझ्या आज्जीनेच सांभाळली होती. नंतर निशा गेल्याला बऱ्याच काळ लोटला आणि त्या दिवशी माझ्या स्वप्नात आली. "आरव, ही मुलगी आपल्या प्रेमाची निशाणी आहे, आतापासून तूच तिचा बाबा आणि तूच तिची आई आहे, तिला जपून सांभाळ."

तिच्या या स्वप्न दृष्टांतामुळे मला एक नवी प्रेरणा मिळाली. आणि त्या दिवसापासून मी तुला अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपायला सुरुवात केली.

अनघाला या कटू सत्याची गेल्या १५-२० वर्षात एकदाही जाणीव करून दिली नव्हती. आरवला आज त्याच्या अश्रूंना थांबवयाचे नव्हते, गेली कित्येक वर्षे आरवने हे दुःख आपल्या हृदयात ठेवले होते, त्याच्या जखमा अजूनही ओल्याच होत्या. त्याला अनघाच्या प्रत्येक वाढदिवसाला ते घाव सलत असत. पण फक्त अनघाच्या खुशीसाठी त्याने आजवर स्वतःला या दुःखात ठेवूनही मुखावर हास्य ठेवलं होतं.

अनघाने आरवचे डोळे पुसून त्याला गप केले, पण अनघा स्वतःला सावरण्याच्या मनस्थितीत नव्हती तरी पण त्याच्या खांद्यावर विसावून लाडिक हट्टाने तिने त्याला सांगितले... "डॅडू, तुम्ही एकटे नाहीत, मी आहे ना तुमच्यासोबत नेहमी."

अनघाने विचारही केला नव्हता असं काहीतरी असल्याचा. त्यामुळे ती अजूनही त्या धक्क्यातून सावरली नव्हती. दुपारच्या जेवणातही तिचे नीट लक्ष नव्हते. रूम मध्ये आल्यावर तिने दरवाजा बंद करून खूप रडली. ती एका

क्षणासाठी तिच्या नशिबाला दोष देऊ लागली. अश्यातच संध्याकाळ झाली. आणि ती त्याच विचारात मग्न असताना अचानक तिच्या दारावर "टक टक" झाली.

दरवाज्याबाहेरून आवाज आला...

"अनघा, अनघा बेटा काय करतेस, झोपली आहेस का? "

"नाही डॅड, थोडासा डोळा लागला होता", असे म्हणता म्हणता तिने आपले डोळे पुसले.

"हा बेटा, चल गार्डन मध्ये जाऊन येऊ या... मोकळ्या वातावरणात फिरशील तर बरं वाटेलं थोडं" आरव बोलला..

पलीकडून अनघाचा आवाज आला.. "नाही डॅड.. आज नको.. थोडा थकवा आला आहे, उद्या जाऊ."

आरव काय समजायचं ते समजला. आणि त्यालाही मनोमन वाटले की, आपल्याला सावरायला तर ३-४ महिने गेले म्हणजे हिला तर मी वेळ द्यायलाच हवा. हा विचार मनाला पटवून त्याने त्याची पावले परत माघारी घेतली. अनघाच्या खोलीबाहेरून परत आल्यावर तो त्याच्या खोलीत गेला. आज त्याला पुन्हा एकदा निशाच्या आठवणींनी कासावीस केले

होते. त्याने त्यांच्या लग्नाचे अल्बम काढून सगळे फोटो पाहण्यात गुंतून जाण्याचा विचार केला. हेतू एवढाचं कि... त्याला त्याच्या निशाच्या आठवणींत जास्तीच जास्त वेळ जाता येईल.

एक पान पालटले, आणि मधोमध दोघांचा लग्नाचा फोटो पाहून लगेच आरवच्या डोळा आसवे जमा झाली. ती लग्नाची खरेदी करायला जाताना झालेली मस्ती... त्या शालूच्या रंगावरून झालेले भांडण आणि यातही निशाने बाजी मारून तिच्या आवडीचा मोरपीसी कलरचा शालू घेतला होता. पण त्या मोरपीसी कलरच्या शालूतही निशा लग्नात फारच उठून दिसत होती. जोडा अगदी लक्ष्मी-नारायणासारखा शोभत होता. मग सहजच पुढची पाने पालटतं असताना ती मंगलाष्टकांच्यावेळी वाढलेली धडधड...ती उखाणे घेताना उडालेली धांदल, तो पहिला जेवणाचा घास भरविताना त्याची अन तिची नातेवाईकांनी उडविलेली टर... सगळं सगळं काही आठवून त्या क्षणात त्याच्या चर्येवरी हास्याची कळी उमलली. अन सगळं डोळयांसमोरून झरझरुन गेलं. आणि येऊन ठेपला पुन्हा तो त्या अनघाच्या जन्माच्या वेळेवरी.

इकडे अनघा... सावरण्याच्या प्रयत्नांत अजूनही ढासळतंच चालली होती. तिला वाटतं होत, कि ती या जगातली कमनशिबी मुलगी आहे... तिचा जन्म झाला अन तिची आई गेली. ती निशाच्या मृत्यूचा दोष स्वतःवर ओढवून घेत होती. २ दिवसाच्या अंतराने तिचा २२ वा वाढदिवस होता. आरवने दरवर्षी प्रमाणे धुमधड्याक्याची मेजवानी असा बेत केला होता. पण ह्या सगळया सत्याचा मागोवा घेतल्यावर स्वतः अनघाने सगळयांच्या नकळत तिचा वाढदिवस साजरा न करण्याचे ठरविले. तिला वाटले, आईला गमावले तिला पून्हा आणू शकणार नाही... पण तिच्या मृत्यूच्यादिनी मी माझा वाढदिवस साजरा न करणं... यामुळे तरी मी तिच्या जीवाला शांती देईल.

आरव पुन्हा एकदा त्याच जाळयात सापडला होता... डोळयासमोर निशाचा चेहरा... आणि मनामध्ये त्याच्या भयंकर आक्रोश चालू होता... याची जिवंत प्रचिती आली... जेव्हा आरवने निशाच्या फोटोचा मुका घेऊन त्यास आपल्या हृदयाशी लावून तो ओक्साबोक्शी रडला. त्याने अनघाला हे सर्व सांगताना तिचा पिता म्हणून आपल्या दुःखाला संयमाचे

बांध घातले होते... परंतु आज अनेक वर्षांपासून दाबून ठेवलेल्या दुःखाचा त्याने टाहो फोडला. दोघांचीही रात्र अबोलच गेली. सकाळी दोघेही काल काही झालेच नाही, अश्या आविर्भावात एकमेकांना सामोरी येऊन सहानुभूती देत होते. अनघा तिच्या कलासला निघून गेली अन थोड्याच वेळात आरवही त्याच्या ऑफिस ला. जरी बाहेर पडले तरी मनातले विचार काही त्यांचा पिच्छा सोडत नव्हते.

आरवने काळजीपोटी अनघाला फोन केला.

"हॅलो अनघा, बेटा किती वाजता फ्री होशील? "

"डॅड, लंचला सुटणार आहे मी. काही झालं का?? " पलीकडून अनघाने उत्तर दिले.

"नाही, काही विशेष नाही... ओके मी तुला पिकअप करतो क्लास वरून, मी लंच ब्रेक मध्ये घरी निघतोय." आरवने फिरवाफिरव न करता मुद्याचं बोलून फोन ठेवला.

मग काम आटोपून आरव निघाला आणि अनघाला तिच्या क्लास मधून पिकअप केले. त्या प्रवासात ना अनघाने

तोंड उघडले ना आरवने. घरी आल्यावर मुकाटपणे जेवून दोघे आपापल्या रूम मध्ये निघून गेले.

नंतर संध्याकाळी पुन्हा आरवने अनघाच्या रूमच्या दारावर "टक टक" केली.

"हा डॅड, जाऊया आपण गार्डन मध्ये आज" अनघाने आरवच्या हृदयाचा ठाव घेऊन उत्तर दिले.

आरव हे ऐकून सुखावला.

"हो बेटा, ये लवकर... मी खाली वाट बघतोय."

"ओके डॅड, हॉल मध्ये वेट करा, मी आलेच फ्रेश होऊन." असे बोलून अनघाने आवरायला सुरुवात केली.

१०-१५ मिनिटांत अनघा हॉल मध्ये आली, आरवने जरा विचारपूस केली, पण तिने काही जास्त खुलासा केला नाही. पण तिच्या सुजलेल्या अन रडून रडून लाल झालेल्या डोळ्यांनी आरवला बऱ्याच साऱ्या प्रश्नाची उत्तरे निमूटपणे दिली होती.

दोघेही नेहमीप्रमाणे गार्डन मध्ये गेले. थोडंसं वॉकिंग झाल्यावर एका बाकावर बसले. आरव काही बोलणार

तेवढ्यातच आरवला त्याचे काही जुने मित्र भेटले आणि आरव त्यांच्याशी बोलण्यात गुंग झाला.

आरव आणि त्याचे मित्र थोडे पुढे येऊन बोलत होत. अनघा तिथे पाठीच राहिली. थोडा वेळ वाट पाहून तिने थोडंसं जॉगिंग करूया असं ठरवलं.

"डॅड, तुम्ही बोला... तोपर्यंत मी एक-दोन राऊंड जॉगिंग करून येते"

"हा.. बेटा सांभाळून जा." आरवनेही परमिशन दिली.

जरा अर्धा राऊंड झाल्यावर.. अनघाला ठेच लागली आणि ती पडली.

"डॅड..." अनघा ओरडली.

पण आरव तिथे नव्हताच.. ती जॉगिंग करता करता खूप पुढे आली होती.

तिचे हे ओरडणे आरवने ऐकले नाही पण जवळच एक बाई होती... ती अनघाच्या मदतीला धावून आली. तिला उठवून बाकावर बसवले... तिला पाणी पाजले...

आजच्या युगात कोण इतकी माणुसकी जपते... अनघाच्या डोक्यात हे विचारचक्र चालू होत. आणि ती बाई... अनघाला बघून तिच्याकडे टक लावून पाहत होती. हो... ती बाई जी अनघाच्या मदतीला धावून आली होती ती दूसरी-तिसरी कोणी नसून "नेत्रा" होती. नेत्राला आठवले... हीच ती मुलगी जिचा त्या दिवशी आपल्याला नकळत धक्का लागला होता अन रात्रभर हिचाच विचार माझ्या माथी घोळत होता. पण अनघाने असे काही नोटीस केले नव्हते. पण आज नेत्रा जेव्हा तिच्या मदतीला धावून आली होती... तेव्हा अनघाने तिचा चेहरा निहाळला होता.

"बाळा, जास्त लागले का?? दुखते का?? एकटी आली आहेस कि सोबत कोणी आहे तुझ्या?? " नेत्रा कासावीस झाली होती.

अनघाला बोलण्याचे भान नव्हते.. ती फक्त त्या स्त्रीला डोळ्यांत साठवत होती.

नेत्राच्या स्पर्शामुळे ती भानावर आली.

"अ..अ.. नाही जास्त नाही दुखत. तसे डॅड आले आहेत माझ्या सोबत" अनघाने नेत्राला निहारीतच उत्तर दिले.

नेत्राने तिला पाणी पाजले आणि बोलली, " एक काम कर... जरा तुझ्या डॅडना फोन लाव आणि इथेच बोलावून घे. तुला चालायला थोडं अवघड जाईल."

अनघाने आरवला फोन केला...

"डॅड... मी पडली आहे, जास्त नाही लागलं.. पण गार्डनच्या लेफ्ट साईडला एका बाकावर बसली आहे. या जरा इथे." काळजी करण्याचे जास्त कारण नाही, असे सांगून अनघाने फोन ठेवला.

इथे आरवची धावपळ सुरू झाली.

एव्हाना अनघा अन नेत्राची बोलचाल सुरु झाली होती.

तशी नेत्रा बोलायला चुणचुणीत. तिनेच पुढाकार घेऊन बोलायला सुरुवात केली.

"बाळा, नाव काय तुझं? कुठे राहते? "

"आंटी, माझं नाव अनघा. इथेच ईस्टला राहते, कोहिनुर कॉम्प्लेक्सच्या पाठी, तुमचं नाव? " अनघाने ही माहिती दिली.

"मी नेत्रा... वेस्टला राहते. आठवतं का काही.. २ दिवसाअगोदर आपला एकमेकिंना चुकून धक्का लागला होता, याच गार्डन मध्ये." नेत्राने सविस्तर माहिती दिली.

अनघाला डोक्यावर जोर देऊन थोडं आठवलं... "हा हा.. सॉरी आंटी.. त्या दिवशी थोडी वैतागलेली होते मी" अनघाने सरळ मनाने माफी मागितली.

तेवढ्यात.. नेत्राला एक फोन आला आणि फोनच नेटवर्क पकडत नव्हतं त्यामुळे अनघाला इशाऱ्यानं सांगून थोडी दूर गेली.

इकडे आरव थोडा काळजीतच अनघाला हाका मारत शोधत होता. अखेरची भेटली अनघा. खूप अंधार होत होता.. म्हणून आरवने अनघाला पटापट धीर देत उठविले आणि घरी चलण्यास सांगितले. अनघाला नेत्राची ओळख आरवशी करून द्यायची होती, पण अंधार झाल्यामुळे आणि नेत्रा फोन वर बोलण्यात बिझी असल्याने तिला तो मोह आवरता घ्यावा लागला.

आणि एकदाचा आरव आणि अनघा घरी येऊन पोहचले. घरी आली तरी अनघाच्या डोक्यातून नेत्राचा विचार काही जात

नव्हता. नेत्राने फोन ठेवून पाठी वळली अनघासाठी... तर अनघा तिथे नव्हतीच. नेत्राला वाटलं बराच अंधार झाला म्हणून घरी गेली असावी. याच विचारांच्या तंद्रीत नेत्रानेही आपल्या घरचा रस्ता धरला. त्या रात्री ना अनघाला झोप आली ना आरवला. नेत्राचेही तसेच झाले होते काहीसे. आईची ममता दाटून आली होती तिची अनघापायी. दुखत असेल का तिला? झोपली असेल का ती? हेच सारे प्रश्न तिला या रात्रीच्या काळात पडत होते, पण उत्तरे मात्र शून्य. इथे अनघाला नेत्राच्या विचाराने झोप येत नव्हती, पण क्षणभरासाठी ती निशाची घटना आपसूक विसरली होती. तर आरवला अनघाची काळजी वाटत होती. आपण हे सगळं काही सांगून चूक केली हेच त्याला राहून राहून वाटत होते अन त्यामुळे तो आतून कासावीस झाला होता. कुठल्या कुठे तोंड उघडलं आणि त्यामुळेच अनघा मनातून खचली आहे आणि आजच्या तिच्या अपघाताचा मीच सर्वस्वी जबाबदार आहे, असं आरवला वाटू लागलं. निशा, मी चुकलो मला माफ कर... माझा निर्णय चुकला... अशी माफीची याचना करता करताच त्याचा डोळा लागला. दुसऱ्या दिवशी अनघाचा वाढदिवस आहे, हे देखील तो या गडबडीत विसरून गेला.

सकाळी उठल्यावर सगळं काही नॉर्मलच होतं. अनघानेही आरव कडून बर्थडे विश एक्सपेक्ट केलं नव्हतं, कारण मुळात तिला स्वतःलाच या दिवसात इंटरेस्ट नव्हता. पण सकाळी नाश्ताच्या टेबलवर बसून जरा व्हाट्सअप्प उघडले असता... आलेल्या मॅसेजेसनी आरवला अनघाचा बर्थडे आठवण करून दिला. त्याने तिला याबद्दल काडीचीही माहिती दिली नाही. तिने सुद्धा पुढे येऊन त्याला गळाभेट दिली आणि थँक्यू बोलून हसली.

पार्टी होतीच... पण सरप्राईस. पण अनघाने आधीच आरवला सांगितले.

"डॅड, आजची बर्थडे पार्टी कॅन्सल करा. मला फक्त तुमच्यासोबतच राहायचे आहे." अनघाने जवळ जवळ पार्टी कॅन्सल करायचे फर्मानच सोडले.

आरव सत्य परिस्थिती जाणत होता, म्हणून त्याने काही आढेवेढे न घेता फक्त मानेनेच होकार दर्शविला.

अनघा नाश्ता उकरून आपल्या क्लासला गेली आणि आरवही आपल्या ऑफिससाठी आवरायला लागला. का कोण जाणे, पण आज निशाची आरवला खूप जास्त आठवण

येत होती. ऑफिसला जायच्या गडबडीतही त्याने आज मनभरून निशाचा फोटो उराशी कवटाळून घेतला आणि जणू काही तिला आपल्यात सामावून त्याने आपले पाय दरवाज्याकडे वळविले.

अनघा क्लासवरून घरी आली, आज जेवायची इच्छा तर मुळीच नव्हती. म्हणून न जेवताच ती आपल्या रूम मध्ये आली. एका कपाटात खूप शोधल्यानंतर तिला सगळे अल्बम मिळाले, ज्यात तिचे पहिल्या बर्थडे पासून ते गत वर्षाच्या बर्थडे पर्यंतच्या सगळ्या आठवणी कैद करून ठेवल्या होत्या. आज पुन्हा तिला त्या जगायच्या होत्या. तो पहिला बर्थडे... तिची आज्जी म्हणजेच तिची आई होती. लहान ते वय, तेव्हा जे दाखवलं ते खर मानल होत. आज्जी तिला केक भरवताना... आज त्या निमित्ताने आज्जीची आठवण आली... ५-६ वर्षे झालीच ती गेल्याला. तेव्हाही अनघा धाय मोलकून जिवाच्या आकांताने रडली होती. आरवने तिला सांभाळले होते. आज त्या सर्व आठवणींनी मनात घर केले होते आणि लागलीच तिच्या डोळा पाणी दाटले होते. त्या आठवणीतून बाहेर येता येता संध्याकाळचे ६ वाजले. आज तिला कालच्या घटनेची

आठवण झाली, त्या बाईने पुढे येऊन तिला वाचविण्याची केलेली धडपड आठवली आणि नकळतच तिची पाऊले बागेत जाण्यासाठी वळाली.

बागेत येऊन तिने त्या कालच्या आंटीची शोधाशोध सुरु केली... बराच वेळ गेला पण तिला ती काही भेटलीच नाही. इथे नेत्रा घरातून निघताना तिलाही अनघाची आठवण झाली. भेटेल का पुन्हा ती? आणि तिच्याकडे बघून का मला मायेचा पाझर फुटतो? अश्या अनेक प्रश्नांनी तिचे डोके भणभणून सोडले होते आणि तिने त्याच तंद्रीत बागेची वाट धरली. अखेर तासा अर्ध्या तासानंतर अनघा ज्या बाकावर बसली होती तिथे नेत्रा येऊन थबकली. अनघा विचारांच्या चक्रात पूर्णपणे गुरफटून गेली होती. त्यामुळे जेव्हा नेत्राने अनघाच्या पाठीवर हात ठेवला, तेव्हा जवळजवळ अनघा दचकलीच. पण जेव्हा तिच्या नजरेला ती शोधत असलेला चेहरा दिसला, तेव्हा तिला हायसं वाटलं. आणि क्षणातच चेहऱ्यावरचा क्षीण निघून हास्य उमललं. तिने हसून नेत्राला अभिवादन केलं.

"हॅलो आंटी, कश्या आहात? " अनघाने दुःख लपवून मोकळ्या मनाने विचारलं.

नेत्रा तर तिच्या बोलण्याचीच वाट बघत होती.

"हो बाळा, मी बरी आहे... तुझं तोंड एवढं उतरल्यासारखं का आहे? काही झालं आहे का? मन सुद्धा थाऱ्यावर दिसत नाही तुझं? " अशी अनेक प्रश्नांची तोफ नेत्राने एकत्रित अनघावर केली.

पण १-२ भेटीनंतर लगेच इतका जिव्हाळा आणि आपुलकी बघून अनघा अवाक् होती. अनघानेही आपले मन तिच्यासमोर मोकळे करण्यास सुरुवात केली.

"आंटी, न सांगता तुम्ही बरोबर ओळखले... कसे काय? "

"बाळा, आईसारखीच आहे ना मी तुझ्या... मग मायेची ममता नेहमी अश्या गोष्टीचा मागोवा घेतच असते." नेत्रा उत्तरली.

पण नेत्राच्या बोलण्यात आईचा उल्लेख झाल्याने अनघाला गहिवरून आलं. आणि डोळयांत आसवे येताच तिने न राहवून नेत्राला घट्ट मिठी मारली.

नेत्राला काही उमजून येईना... नक्की काय झाले? ही आतापर्यंत तर ठीक होती... अचानक अशी कशी? अनघाच्या डोक्यावरून हात फिरविता फिरविता तिला गप केले.

"बाळा, शांत हो. अशी का रडतेय? काय झालंय ते सांगशील का? " नेत्राने दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

" आंटी, आजच्याच दिवशी मी माझ्या आईला गमावलं होतं" अनघा रडताना हुंदके आवरण्याचा प्रयत्न करीत होती.

"सॉरी बाळा, मला माफ कर. माझा असा काही एक विचार नव्हता." नेत्राने आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.

"आंटी तुमची काही चुकी नाहीये... आज मी अपसेट होती सकाळपासून.. खरं तर आज माझा बर्थडे.. पण कालच डॅडनीं मम्माबद्दल सांगितलं. मला जन्म देता देता तिला मरण आलं." अनघानं तपशीलवार माहिती नेत्राला पुरविली.

नेत्राचा मायेचा पदर अनघासाठी खुला झाला. तिने तिला सहानुभूतीने कुशीत घेतले आणि दिलासा दिला. अनघाला नेत्रामध्ये जणू काही तिची दुसरी आईच दिसू लागली.

घरी परतीच्या वाटेला तिला नकळतच एक आनंद नेत्राच्या रूपाने गवसला होता. आरवने घरी आल्या आल्या अनघाचा हा चेहऱ्यावरचा आनंद टिपला होता. थोड्या वेळासाठी का होईना, पण अनघा निशाच्या मृत्यूची घटना विसरली होती. आरवने वेळ काढून अनघाला या आनंदाबद्दल विचारले होते...

"डॅडू, २ दिवस अगोदर ज्या आंटीने मला गार्डन मध्ये सावरलं होतं ना... ती आज पुन्हा मला भेटली." अनघाने जास्त विचार न करता आपला आनंद आरवला व्यक्त केला. आरवही अनघाला झालेल्या आनंदामुळे खुश झाला. घरीच गोडधोड जेवण करून दोघांनी तिचा बर्थडे साजरा केला.

अशीच १-२ वर्षे लोटली. नित्यनेमाने नेत्रा आणि अनघा न चुकता बागेत भेटत होत्या. त्यांचे एक नवीन नाते जुळून आले होते. आता दोघीही एकमेकींना बऱ्यापैकी ओळखत होत्या. एकमेकींच्या आवडीनिवडी पासून ते बर्थडे, खाण्याच्या गोष्टी अन अजून बरंच काही... सगळं सगळं ठाव झालं होतं. आरवला अनघाने याची पूर्वकल्पना दिली होतीच. पण त्याच्या बिझी शेड्युल मुळे त्याला बागेत जायला आणि नेत्राला

भेटायला योगच जुळत नव्हता. पण अनघा त्या बाईशी बोलून खूप खुश असते, यातच आरवला खरं समाधान होतं. नंतर पुढच्या शिक्षणासाठी अनघाला दुसऱ्या शहरात जावे लागणार होते. नुकतीच परीक्षा संपली होती आणि आता तिला निकालाचे वेध लागले होते. पण त्या निकालाच्या आतुरतेतही तिला आपल्या डॅड ना सोडून जावे लागेल आणि नेत्रा आंटीला रोज भेटायला मिळणार नाही या भावनेचे दुःख मनात सलत होते. अन शेवटी निकालाची वेळ येऊन ठेपली... आज अनघा जरा उशिराच बागेत आली. नेत्राला तिच्या चेहऱ्यावरूनच काहीतरी बिनसले आहे, असे समझले. नंतर अनघाने नेत्राला सर्व काही सांगितले आणि रडायला लागली. पण नेत्रा मोठी ना... तिने अचूकपणे अनघाला समजावले. मग अनघाने लहान मुलीप्रमाणे तिच्या नेत्रा आंटीकडून पिंकी प्रॉमिस घेतले. "आंटी, मला पक्का विसरणार नाही ना तुम्ही?? "

तेवढ्याच लाडीकपणे नेत्रानेही तिला तिच्याच भाषेत उत्तर दिले.

"हो बाळा... पक्कावाला प्रॉमिस हा. तुला कशी विसरेन गं मी? परत आल्यावर नक्की भेटूया... तोपर्यंत काळजी घे

स्वतःची..." नेत्राच्या बोलता बोलता गळा दाटून आला. आणि दोघीनीही एकमेकींना आलिंगन देऊन निरोप घेतला.

# २

आता परगावी जाऊन अनघाला २ महिने होत आले. रोज भेटता येत नाही पण नेत्रा आणि तिचे फोनवर रोजचे संभाषण ठरलेले असते. आरवही अनघाला खूप मिस करत होता. त्याला त्याचा तो एकटेपणा खायला येत होता. या ना त्या कामामध्ये तो स्वतःला बिझी ठेवायचा आटोकाट प्रयत्न करत होता.

एके दिवशी कामाच्या व्यापामुळे त्याला खूप त्रास झाला होता. आणि त्यातच त्याला थकल्या सारखे जाणवत होते. गाडी चालविताना त्याच्या डोळ्यासमोर अंधार आला आणि... त्याची गाडी एका खांबाला जाऊन ठोकली. नेत्रा त्याच वेळी बाजारात जात असताना तिला एका ठिकाणी माणसांचा घोळका दिसला आणि नकळतच ती त्याकडे ओढून गेली. माणूस ओळखीचा नव्हता आणि गर्दीतील सगळ्या माणसांनी ओळखण्यास नकार दिला. नेत्राला राहवेना... म्हणून तिने अम्बूलन्सला फोन करून आरवला सिटी हॉस्पिटल मध्ये

भरती केले. आरव अजूनही शुद्धीवर नव्हता. तिने माणुसकीच्या नात्याने तो शुद्धीवर येईपर्यंत तिथे थांबण्याचे पसंत केले.

२ तास झाले तरी आरव अजून शुद्धीवर आला नव्हता. जेवणाची वेळ होत होती. नेत्राने ठरविले... घरून जेवणाचा डब्बा आणावा.. शुद्धीवर आल्यावर भूक लागेलच की. अखेर तिने पटापट घरी येऊन जेवण बनविले आणि तासाभरात ती जेवणाचा डब्बा घेऊन हॉस्पिटल मध्ये दाखल झाली. तरी अजून काही आरव शुद्धीवर आला नव्हता. बऱ्याच वेळ वाट पाहिल्यानंतर आरव शुद्धीवर आला.. डोळे उघडताच त्याच्या समोर अपरिचित व्यक्ती उभी होती. आरव आश्चर्याने नेत्राला पाहत होता. तेवढ्यात डॉक्टरांनी सांगितले,

"मिस्टर... तुमच्या कारचा अपघात झाला सकाळी अन या बाई तुम्हाला हॉस्पिटल मध्ये घेऊन आल्या आहेत."

आरवला काय बोलावं ते सुचेना... त्याने थँक्यू बोलण्यासाठी हात जोडले तेवढ्यात नेत्राने त्यांना नजरेनेच खुणावले कि याची काही गरज नाही... पहिले ठीक व्हा.. नंतर बघू.

"गरमागरम जेवण आणलं आहे, खाऊन घ्या.. तुम्हाला बरं वाटेल." नेत्राने सांगितलं.

आरवला हे अनपेक्षित होतं.

"अहो, तुम्ही का हा त्रास करून घेतलात." आरवने अवाक् नजरेने म्हटलं.

"आता माणूस माणसाच्या मदतीला नाही येणार, तर कोण येणार? " नेत्रानेही तिची बाजू मुद्देसूद मांडली.

शेवटी आरवला ते जेवण जेवण्याशिवाय काही पर्याय नव्हताच.

तशा नेत्राच्या २-४ दिवस हॉस्पिटलच्या फेऱ्या वाढत होत्या. दोन्ही वेळेला आरवसाठी आवर्जून माणुसकीच्या नात्याने नेत्रा न चुकता जेवणाचा डब्बा घेऊन जायची. आरव विचार करायचा... या दयाळू बाईचे मी ऋण कसे फेडावे?? पण त्यालाही काही केल्या उत्तर सापडत नव्हते. अखेर आरवला डिस्चार्ज मिळाला... डॉक्टर आरवला काही सूचना देत होते. वेळच्या वेळी बँडेज आणि गोळया घेण्यासाठी... तेवढ्यात डॉक्टरांनी विचारले... "घरी कोण कोण असतं?? "

आरवला यावेळी भरून आलं. नकळत त्याला अनघाची आठवण आली.

"डॉक्टर, असा का प्रश्न केलात? " आरवने चौकशीपुरता विचारले.

"नाही ते तुमची शुगर लेव्हल कधीही कमी होऊ शकते अन त्यामुळे तुमचा तोल जाऊ शकतो, घरी कोण असेल तर बरं पडेल..."

"सध्या तरी घरात मी एकटा आहे.काही दुसरा पर्याय नाही का? " आरवने काकुळतीने विचारले.

"आहे ना... मग तुम्हाला थोड्या अवधीसाठी एक केअरटेकर ठेवावी लागेल. " डॉक्टरांनी विश्वास देत आरवला पर्यायाची जाणीव करून दिली.

आरव आणि डॉक्टरांच्या नकळत नेत्राही त्या दोघांचे बोलणे ऐकत होती. त्या दोघांना मध्ये थांबवत तिने आरवला मदतीसाठी हात पुढे केला.

"जिथपर्यंत तुम्हांला बरं वाटत नाही, तोपर्यंत तुम्ही माझ्या घरी राहू शकता. मी तुमची सर्वतोपरी काळजी घेण्याचा प्रयत्न करीन. बरे झाले की तुम्ही जाऊ शकता."

आरवला यावेळी जाणवले... किती उपकार घ्यायचे अजून... बस झाले ! मी माझे मॅनेज करू शकेल. डोक्यात शक्कल लढवून आरवने नेत्राला सांगितले. " नाही राहू द्या.. मी करेल तेवढं अडजेस्ट. तुम्ही उगाच टेन्शन घेऊ नका."

नेत्रानेही शेवटी मान्य केले. आरवलाही धन्यता वाटली. आरव औषधे घेऊन त्याच्या वॉर्ड मध्ये जात असतानाच त्याच्या तोल जाऊ लागला... त्याला पुढे अस्पष्ट अंधार जाणवू लागला आणि काही कळणार तेवढ्याच त्याला चक्कर येऊन तो खाली पडला. नेत्रानेही पाठून कसला मोठा आवाज आला, हे बघिण्यासाठी मान फिरवली... तर मगाशीच ज्यांच्याशी बोलत होती, तेच गृहस्थ घेरी येऊन खाली पडले होते. आता नेत्राची बाजू भक्कम झाली होती. आरवला तिच्या घरी जाण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नव्हता.

त्याला डिस्चार्ज मिळाल्यावर तो, औषधे आणि त्याची फाईल घेऊन नेत्रा तिच्या घराकडे रवाना झाली.घर तसे छोटे

होते पण हवेशीर आणि स्वच्छ होते. घरातली गॅलरी तिने निरनिराळया रंगीबेरंगी फुलझाड्यानी सजविली होती. सगळं कसं मस्त आखीव रेखीव दिसत होतं. पहिल्याच नजरेत आरवला तिचे घर आवडले, पण त्याने तसे काही बोलून दाखवले नाही.

"या... मध्ये बसा... मी चहा ठेवते. " नेत्राने आरवला भानावर आणले.

त्याने हॉलमध्ये प्रवेश करून तिथल्या सोफ्यावर बैठक मांडली. बाहेरच्या देखाव्यापेक्षाही घरातली वस्तूंची ठेवण मस्त होती. तेवढ्यात नेत्राने चहा बिस्कीटची प्लेट त्या टेबलवर ठेवली. आणि इथल्या तिथल्या गप्पा सुरु व्हाव्या म्हणून नेत्राने विषयाला हात घातला.

" मग कोण कोण राहता तुम्ही घरात? "

" मी आणि माझी मुलगी राहते... पण २ महिन्यांपूर्वी ती तिच्या कामासाठी out off station आहे." आरवने पूर्तता केली.

"तुम्ही एकट्याच राहता का? " आरवने विचारले.

"हा... म्हणजे नाही. माझा मुलगा आहे, पण तो कामासाठी परगावी राहतो, अधूनमधून येत असतो भेटायला" नेत्राने आपली कहाणी ऐकविली.

थोड्याश्या गप्पाटप्पा झाल्या, तेवढ्यात नेत्राने टेबलावरील आवरले आणि आरव कडे बघून म्हणाली,

"तुम्ही बसा येथे... तोवर मी तुमच्यासाठी खोली साफ करून येते."

आरवकडे तिचे ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याने मानेनेच "हो" बोलून संमती दिली.

अर्ध्या - एक तासाभरात नेत्रा खोली साफ करून आरवला खोलीत आराम करायला नेण्यासाठी आली. तोवर आरवचा डोळा लागला होता. मग त्याची झोपमोड होऊ नये म्हणून नेत्राने त्याला उठवले नाही. तिने तिचे आवरून घेतले. डॉक्टरांशी कॉन्टॅक्ट करून आरवला देण्याच्या टॅबलेट आणि जेवणाचे पथ्य विचारून घेतलं आणि सुमारे ११च्या वेळेत जेवण्याच्या तयारीला लागली.

तेवढ्यात आरव उठला. नंतर त्याला उमजले कि बसल्या बसल्याच त्याचा डोळा लागला होता. मग नेत्रा कुठे आहे, यासाठी त्याने किचन गाठायचे ठरवले. नेत्राला कोणाच्या तरी येण्याची चाहूल लागली, म्हणून पाठी वळून पाहिले तर ते मगाचेच गृहस्थ होते.

"मी आले होते, खोली दाखवायला... पण तुमचा डोळा लागला होता, म्हणून जेवणाच्या तयारीला लागले." नेत्राने ओले हात पुसत सांगितले. मग आरवला त्याची खोली दाखवली. खोली सुद्धा हवेशीर होती.

"आवडली का? ही माझ्या मुलाची खोली. जास्त वापरात नसते, म्हणून थोडी साफ करावी लागली. " नेत्राने आपले म्हणणे पटवून दिले.

"हो ना... का नाही आवडणार. इतकी स्वच्छ आणि हवेशीर आहे ना." आरवनेही पुष्टी जोडली.

मग आता बसा... आराम करा.. कपाटात माझ्या मुलाचे कपडे आहेत.. अंघोळ करून फ्रेश व्हा... जेवण तयार होतेय." नेत्राने आरवला सांगितले आणि जेवण बनवायला गेली.

आरवनेही अंघोळ करून कपडे बदलले. आणि तेवढ्यात नेत्राने जेवणासाठी आवाज दिला.

जेवता जेवता...

आरव घास घेताना नेत्राला बोलला, " आपण माझ्यासाठी इतकं करताय, परतफेड कशी करावी तेच कळत नाही."

"अहो, परतफेड कसली... मी धन्यता मानते. तसे आपण २-३ दिवस झाले समोर येतोय पण आपली नाव ओळख झालीच नाही. माझे नाव नेत्रा." नेत्राने ओळख करून दिली.

"अरे हो ना.... माझ्याही लक्षात नाही आले. माझे नाव आरव..." आरवनेही आपली तोंडओळख करून दिली.

"ओके, आरव नाव आहे आपलं. बरं बरं... आता ठीक झाल्यावरच जा आणि हो मुलगी आली की घेऊन या एकदा इथे." नेत्राने सांगितले।

"हो, हो नक्की आणेल ना." आरवने आश्वासन दिले.

त्यातच आरवने समोरून विचारले, "नेत्रा मॅडम, तसे मला वाचविण्याचे इतके प्रयत्न का केलेत? वाईट वाटून घेऊ नका... मी फक्त उत्सुकतेपोटी विचारतोय... त्याचं काय आहे ना..

आताच्या जमान्यात माणुसकी नावाची गोष्ट अगदीच दुर्मिळ झाली आहे. पण तुम्ही मला देवरूपाने भेटल्या आणि आज मी जिवंत आहे" आरवने सखोल स्पष्टीकरण दिले.

नेत्राच्या डोळयात पाणी आले, पण तिने सावरले होते आणि ती आरवला सांगू लागली.

"आरव साहेब, माझ्या मिस्टरांचेही प्राण कार अपघातातच गेले. त्यांना रक्ताची गरज होती. जागीच मृत्यू झाला. आणि त्यामुळे मी जितक्या सदम्यात होती, त्याची जाण मला आहे. मला मनोमन वाटतं... ज्या दुःखाच्या डोंगरातून मी गेलेय, त्यातून कोणी दुसऱ्यानं मुळीच जाऊ नये. तुम्हांला तुमच्या फॅमिलीसाठी वाचवलं मी." नेत्राने सत्य परिस्थिती आरवच्या लक्षात आणून दिली.

आरवनेही कृतार्थ नजरेने नेत्राकडे पाहिले आणि मनात विचार करू लागला... कि आजही माणुसकी जिवंत आहे या कलियुगात आणि मी वाचलोय फक्त त्यामुळेच आज.

त्यानंतर दोघांची जेवणे झाली आणि आराम करायला आपापल्या रूम मध्ये निघून गेले.

आरव खोलीत येताच त्याला अनघाची आठवण झाली. तो तिला कॉन्टॅक्ट करायला त्याचा फोन शोधत होता... पण त्याला हे ठाऊक नव्हतेच कि त्याचा फोन त्या कार अपघातात चिरडून गेला होता. फोन मिळाला नाही, तेव्हा शांत बसल्यावर त्याच्या मनात विचार फेर धरू लागले. खरंच मी अनघाला हे सगळं सांगू का?? काळजीच्या ओघात ती तिचे काम सोडून धावत येईल?? आपण आता ठीक आहोत ना?? ती परत यायच्या अगोदर आपण ठीक होऊच. मग का सांगून तिला त्रास देऊ मी? मला नेत्रा मॅम शी बोलावं लागेल या बद्दल. झोपेसाठी आला होता, पण अनघाच्या विचारांमुळे झोपच उडून गेली. आता त्याला कधी एकदा संध्याकाळ होते आणि नेत्राला हे सगळं सांगतो असं झालं होतं. इकडे नेत्राच्या मनातही तसेच काहीसं वादळ उठलं होतं... मुलाला सांगू कि नको?? काय करावं हे तिला सुचतच नव्हतं.

संध्याकाळी चहासाठी एकत्र आले तेव्हा दोघांचेही चित्त थाऱ्यावर नव्हते. मती संभ्रमित होती. आणि त्यातच नेत्राच्या हातून चहाचा ट्रे खाली पडला. आरव धावत गेला आणि कुठे लागले का याची चौकशी केली. नंतर बोटाला दुखापत झाली

होती, म्हणून त्याने तिचे बँडेज केले. मग त्याने स्वतः चहा बनवला दोघांसाठी.

"नेत्रा मॅम, तुम्ही खूप अस्वस्थ दिसताय, काही झाले आहे का? " यावेळी आरवनेच पुढाकार घेणं त्याला योग्य वाटलं.

"हो म्हणजे नाही... नाही तसं काही मोठं नाहीये " नेत्रा द्विधा मन:स्थितीत सगळं सांगत होती, आरवने हे जाणले.

"अहो मॅडम, माझ्याही काही शंका आहेतच... काही प्रॉब्लेम्स आहेत ज्यांच्याविषयी मी तुम्हांला विचारण्याचा विचार करतोय, आणि तुम्ही... तुम्ही स्वतः साशंक?? ? " आरवने समजुतीच्या स्वरात स्पष्ट केलं.

"हा... सांगते... तसं वेगळं वाटून घेऊ नका.. पण हे सगळं होतंय ते माझ्या मुलाला सांगू का? तसं सांगितल्यावर तो 'नाही' म्हणणार नाही.पण काळजीने हुरहूर लागेल त्याला, त्याचे कामावरचे लक्ष उडेल... आणि महत्वाचे म्हणजे ह्या सगळ्या मुळे त्याची लाईफ डिस्टर्ब होईल." चिंतातुर स्वरात नेत्राने तिची बाजू आरव पुढे मांडली.

आरव गालात हसत म्हणाला... " अगदी हुबेहूब, माझ्याही डोक्यात माझ्या मुलीबद्दल हेच विचार येत आहेत, काय करावं सुचत नाही "

दोघांनी शेवटी निर्णय घेतला... आता उगाच मुलांना सांगून त्यांच्या कामात अडथळा आणण्यापेक्षा आल्यावर सगळं सांगून भेटही घडवून देऊच. नेत्रा सोबत आरवच्याही चेहऱ्यावर समाधानाचं हसू पसरलं.

# ३

दिवस जात गेले, २-३ महिने उलटले.. आरवच्या परिस्थितीत चांगला बदल येत होता. वेळोवेळी चेक अपसाठी नेत्रा आरव सोबत डॉक्टर कडे जायची. त्यांचं एक निनावी नातं फुलत होत, पण त्यांच्या मर्यादा त्यांना ठाव होत्या... भावनेच्या भरात त्यांनी कधी चुकीचा मार्ग धरला नव्हता.

इथे एकीकडे... रोज अनघाचे नेत्राशी आणि आरव शी सुद्धा बोलणं होतं होते. पण आरवनेही काही थांगपत्ता लागू दिला नव्हता. आज शनिवार होता, बऱ्याच दिवसांनी तिला ऑफिसच्या कामापासून सुट्टी मिळाली होती. तिचा तसा काही खास प्लॅन नव्हता... तेवढ्यात दारावर टकटक झाली, उघडून पाहिले तर तिची ऑफिस मधली एक मैत्रीण शालू होती.

"अगं अनघा, आज सुट्टी आहे... काही खास?? " शालूने खोलीत येता येता विचारले.

"नाही गं, अजूनतरी काही नक्की नाहीये." अनघानेही खरं काय ते सांगितले.

"चल मग, शॉपिंगला जाऊया.. मी ऐकले आहे इथे खूप चांगल्या क्वालिटीच्या वस्तू असतात." शालूने आपला पर्याय थोपवलाच.

"हा, ठीक आहे चल निघूया." अनघाकडे हो बोलण्याशिवाय काही पर्याय नव्हता.

मग दोघीही तयार होऊन शॉपिंगसाठी निघाल्या. खूप सारे मॉल्स फिरल्या, बरीच सारी शॉपिंग केली आणि नंतर खाऊन पोटे भरली. आता काहीतरी मूवी किंवा शो बघू या.. असा विचार केला. त्याच मॉल मध्ये एक शो होता.. " शायरी कि दास्तान.." दोघी लगबगीनं तिथे पोहचल्या आणि कार्यक्रमात सामील झाल्या. एव्हाना २-४ शायर आपली कलाकारी दाखवून मोकळे झाले होते... पण अनघाला काही खास आवडली नव्हती, ती येथून पळ काढायच्या प्रयत्नात होती आणि इतक्यात ……

इतक्यात स्टेज वरच्या एका आवाजाने तिचं लक्ष वेधलं...इतक्या वेळ त्या स्टेजवर हिंदी मधल्या शायऱ्यांनी गलका घातला होता, पण थोड्याश्या परिचित मराठी टोन मुळे तिचं लक्ष त्यावेळीच स्टेजवर वेधून घेतले.

"मी, लक्षक साने तुमच्यासमोर एक कविता सादर करतोय" स्टेजवरून आलेल्या आवाजाने अनघाचे कान-डोळे दोन्ही तिकडे चुंबक्तविय आकर्षणाने खेचून घेतले.

स्टेजवरून पुन्हा तोच हृदयस्पर्शी आवाज आला.

" माझ्या कवितेचं नाव आहे, "एक नातं..."

***एक नातं असावं.. आपलंसं वाटणारं..***
***कधी कधी रक्ताच्या नात्यासमोरही***
***थोडं जास्त उजवं ठरणारं...***
***विरहाच्या वेळीसुद्धा***
***डोळा दोन अश्रू जास्त आणणारं...***
***एक नातं असावं... आपलंसं वाटणारं !***

***असावी ती ओढ त्या नात्यामध्ये...***
***दुरावा अन वियोग***

*नसावा कधी असा त्यामध्ये...*

*आयुष्यभर सोबतीस असावं...*

*असं एक नातं असावं... आपलंसं वाटणारं !*

*जपावी ती वेगळीक त्या नात्याची...*

*वीण असावी त्यास*

*विश्वास अन निखळ प्रेमाची...*

*नेहमी बहरून यावं...*

*फुलांच्या सुगंधासारखं...*

*एक नातं असावं... आपलंसं वाटणारं !"*

क्षणभर सगळ्या हॉलमध्ये प्रचंड शांतता... यातूनच कळत होती की खरंच ती कविता खूपच हृदयस्पर्शी होती. अखेर दोनेक मिनिटांनंतर टाळ्यांचा कडकडाट झालाच. प्रेक्षकांना सावरण्यासाठी थोडा वेळ लागला होताच, हे नव्याने सांगायला नकोच आता. त्या प्रेक्षकांत अनघाही होतीच टाळ्या वाजवत

त्याला प्रतिसाद देताना... कळत नकळत ते लव्ह अँट फर्स्ट साईट म्हणतात ना... तसं काहीसं झालं होतं तिला... त्या शायर लक्षकला पाहिल्यावर. शो संपल्यावर तिने लक्षकला भेटायचा प्रयत्न केला... पण तो निरर्थक ठरला. पण ती त्यावर थांबली नाहीच. घरी येऊन अख्खा सोशल मीडिया पालथा घातला.. पण लक्षक म्हणून कोणी दिसेना... लक्षक सर्च केलं की ललित, ललेश, लव, लवंश असे काहीसे लोक तिला मिळाले. ती हताश झाली. शो नंतर भेट झाली नाही, तेव्हा सोशल मीडिया हा ऑप्शन होताच, पण आता यानेसुद्धा तिची निराशा केलीच. तसेच २-४ आठवडे गेले. आता शेवटी तिने "लक्षक"चा विचार सोडला होताच. मग एकेदिवशी ऑटो मधून प्रवास करत असतानाच... जरा जास्तच ट्रॅफिक होती, ऑफिसला लेट झाले होतेच, तसेच पैसे देऊन तिने ऑफिसचा रस्ता गाठला. चालता चालता.. नकळत तिच्या तिचा एका इसमाला धक्का लागला आणि त्याच्या हातच्या सगळ्या फाईल खाली पडल्या. अनघाला आपली चूक कळून आली...

"सॉरी, चुकून धक्का लागला तुम्हाला.. मी करते मदत, वेट " असे बोलून अनघा एक एक फाईल उचलू लागली.

फाईलवरचं नाव सहज वाचलं " लक्षक साने ", कुठेतरी हे नाव ऐकलं आहे, असा विचार करत तिने वर पाहिले... पाहिले तर तोच होता तो... "लक्षक शायर..." एव्हाना लक्षकही अनघाच्या सौंदर्यावर भाळून गेला होता. अनघाच्या बोलण्याने त्याला भानावर आणले.

"एक्सक्युज मी... आपण लक्षक साने का? " अनघाने चेहऱ्यावर हास्य आणून विचारले.

"हो, मीच लक्षक साने. का? " ही मुलगी आपल्याला ओळखतेय याचा विश्वास बसत नव्हता त्याला.

"म्हणजे, त्या "शायर शो" मध्ये तुम्ही होतात का?? " अनघाने उत्सुकतेपोटी अजून खोलात जाऊन चौकशी केली.

"हो, मीच तो... पण आपण असे का विचारताय..." लक्षकने सुद्धा आश्चर्यजनक नजरेने विचारले.

एवढ्यात पावसाची मोठी सर आली आणि ही दोघे भर रस्त्यात उभी असल्याने थोडीशी भिजलीच. मग लक्षकनेच अनघाला कॉफीसाठी विचारले, भिजल्यामुळे कुडकुडत होती, म्हणून तिनेही जास्त काही विचार न करताच होकार दिला.

कॉफी शॉप मध्ये कॉफीची ऑर्डर देऊन बसले असताना... लक्षकने पुन्हा विचारले...

" तुम्ही ओळखलं कसे मला? "

" नाही, खरं तर मी त्या शोला पहिल्यांदाच गेले होते आणि तिथे तुमची ती कविता ऐकली.. छान वाटली. नंतर भेटायचे ट्राय केले, पण तुम्ही तिथे नव्हताच." अनघाने स्पष्ट पणे आपले मत मांडले.

"अगं, कम ऑन यार मला तुम्ही आम्ही करू नकोस, आपण बहुधा सारख्याच वयाचे आहोत." लक्षकने अनघाला सुचवले.

"तसे तुला माझे नाव कळलेच आहे.. मग तुझे सांगशील का? " कॉफीचा एक घोट घेता घेता लक्षकने विषय वाढवला.

"हो ना... माझं नाव अनघा, अनघा कुलकर्णी " अनघानेही आपली ओळख दिली.

"मग इथेच राहता कि काही काम होतं? " लक्षकने पुन्हा खोलात विचारणा केली.

"नाही... मी मुंबईला राहते, जरा कामासाठी आली आहे, तू? " अनघाने सांगितलं.

"माझंही तसंच आहे..मुंबईलाच राहतो मी, सध्या ऑफिसच्या कामासाठी आलोय" लक्षकने आपली कहाणी ऐकविली.

"मला वाटलं इथलाच असेल तू, कारण त्या दिवशी शो मध्ये कविता अँड ऑल." अनघाने आपले निरीक्षण ऐकवले.

"नाही, ते काय झालं, माझे मित्र यायला उशीर झाला होता, तर फिरत फिरत त्या शो कडे गेलो आणि बघितले एक दोन शायर... तर म्हटलं माझी पण कविता होऊन जाऊ दे... म्हणून सहजच." लक्षकने आपला छंद आणि आवडीची जाणीव करून दिली.

"हो, फारच आवडली ती कविता तुझी, एकदम आपल्या पणाचा फील आला त्यात." अनघाने लगेच कॉम्प्लिमेंट देऊनच टाकली.

" ओहो.. थँक्यू थँक्यू... " लक्षकनेही खुल्या मनाने तिची कॉम्प्लिमेंट स्वीकारली होती.

जरा घड्याळाकडे नजर जाताच अनघा उठली, तिला ऑफिससाठी लेट झालंच होत. सॉरी बोलून ती घाईने निघून गेली. तिचे मन नव्हतेच, पण ऑफिससाठी जावं लागलं तिला. इथे लक्षक चेही तेच झाले... लव्ह अँट फर्स्ट साईट. तोही कामाच्या गडबडीने बिल चुकतं करून निघून गेला.

पूर्ण दिवस दोघेही एकमेकांच्याच आठवणीत होते, आणि स्वतःच्या मतीला कोसीत बसले होते, फोन नंबर तरी घ्यायला हवाच होता.

इकडे, आरव आता बऱ्यापैकी ठीक झाला होता. आता त्याच्यात आणि नेत्रामध्ये मैत्रीचं नातं फुललं होतं. त्यांच्या आवडीनिवडी ती बऱ्याच सारख्या होत्या. बरे वाटल्यावर एके दिवशी आरवनेच नेत्राला सांगितले...

"नेत्रा, मी काय म्हणतोय आता मी ठीक आहे.. एकदम ठणठणीत, मग घरी जायला हवंच ना... माझी मुलगी पण येईलच महिन्याभरात... उगाच तुला अजून कसला ताप नको "

"हो, चालेल तसं तुला ऑफिस पण जॉईन करावं लागेल रे.." नेत्रानेही त्याला सपोर्ट केला.

# ४

दुसऱ्याच दिवशी ते दोघे जाऊन पहिले आरवच्या घराची साफसफाई करून आले, आणि येत्या दोन दिवसातच आरव त्याच्या घरी शिफ्ट झाला. तशी त्याला नेत्राची कमी खळत होतीच, पण त्याचे कधीतरी कॉल वर बोलणे, नाहीतर बागेत भेट होतंच असे. अधून मधून नेत्राही दुपारचे जेवण बनवून आरव कडे येत असे.

तिकडे अनघा आणि लक्षक एकमेंकांच्या प्रेमात पडले होते, पण अजूनही एकमेकांपुढे व्यक्त झाले नव्हते, आणि व्यक्त होण्यासाठी नशिबाने त्यांना साथ दिली नव्हतीच. पण शेवटी नियती ना ती... कधी ना कधी तरी आपल्यासाठी योग्य ते डाव रचतच असते.

उद्या पून्हा एकदा लक्षकला भेटायचा प्रयत्न करून बघायला हवा.. बिछान्यात असतानाच अनघाने विचार करून ठेवला.

त्याच दिवशी अनघाला ऑफीसमध्ये बॉसने केबिनमध्ये बोलावले.

"अनघा, after 4 days we have meeting with clients and we have to sign the deal, so I'm going to give you whole responsibility of this client. you must give your Best." अनघाच्या बॉसने फर्मान सोडलं.

आता खुश होऊ कि लक्षकला शोधायचा प्लॅन फसला म्हणून दुःखी होऊ, अनघाला कळतच नव्हतं.

शेवटी तिने जबाबदारी स्वीकारली..

"येस मॅम, आय विल." अनघाने संमती दर्शवून केबिन बाहेर पडली.

कारण अनघाला कळून चुकलं होतं, हि जबाबदारी म्हणजे हा अख्खा आठवडा बिझी शेड्युल... लक्षक काय आणि कसलं काय... हा आठवडा म्हणजे फक्त काम काम आणि कामच. पण आपला गोल काय आहे, याचं भान ठेव जरा... हळूच तिचे दुसरे मन बोलले आणि मग तिने कामाला सुरुवात केली. म्हणजेच थोडक्यात काय... या आठवड्यात लक्षक वगैरे

काही नाही... फक्त काम एके काम. तिथे लक्षक न चुकता त्याच जागी थांबायचा... फक्त एका आशेवर कि त्याला ती अनघा पुन्हा एकदा दिसेल... तो त्याच्या मनातले तिला सांगेल आणि बरंच काही... पण ना अनघा दिसायची ना काही. पण नेमाने तो येऊन त्याच ठिकाणी तिची वाट बघायचा.

शेवटी त्याचे जसे तसे चार दिवस गेले, चित्त थाऱ्यावर नव्हतंच.

आणि अनघाचेही हे दिवस कामाच्या व्यापात गेले, आणि घेऊन ठेपला तो दिवस ज्या दिवशी तिच्या सगळ्या मेहनतीचं प्रेझेंटेशन तिला क्लायंट समोर द्यायचं होत. तिचं दुसरं मन लक्षकला भेटण्यासाठी अधिर होतं, पण मग तिने फक्त आजचा दिवस उद्यापासून परत लक्षकला शोधू, असे आश्वासन मनाला देऊन ती प्रेझेंटेशनसाठी तयार झाली.

सकाळी ऑफिसला पोहचल्यावर सगक्या फाईल चेक करून नंतर क्लायंटची वाट पाहत होती. १० वाजताची मिटिंग होती, म्हणून थोडंसं फ्रेश होऊन यावं असा विचार करून ती वॉशरूम कडे वळाली. आणि तेवढ्यात तिला कोणाचा तरी

धक्का लागला, आणि चमकून तिने वर पाहिले तर तो दुसरा तिसरा कोणी नसून, "लक्षक" निघाला. तिला वाटले ती दिवसा ढवळ्या स्वप्न बघतेय, असं मनात बोलत तिने स्वतःला एक चिमटा घेतला.

"आssss... स्वप्न नाहीये.. हे खरं आहे." अनघा स्वतःशी पुटपुटली.

"ओहो मॅडम, इथे आम्ही तुम्हांला शोधून शोधून दमलो, आणि सापडलात कुठे?? तर इथे, ह्या ऑफिस मध्ये " लक्षक सुद्धा तिला समोर बघून अवाक् होता.

"हो, मी इथेच काम करते, बाय द वे तू इथे कसा?? मी नाही पाहिले कधी तुला इथे?? " अनघाने त्याला प्रतिप्रश्न केला.

"हो, कसं पाहणार मी इथे काम करत नाही, मिटिंगसाठी आलोय" लक्षकने खुलासा केला.

अनघा दोनेक मिनिटं अगदी स्तब्ध झाली. मनात तिच्या विचारांचं वादळ उठलं.. म्हणजे मी जे प्रेझेंटेशन तयार केले आहे ते ह्याच्या कंपनीसाठी आहे. ती होती त्यापेक्षा अधिकच अस्वस्थ झाली. त्याला कळेना... नक्की हिला काय झाले..?

"काय मॅडम, नर्व्हस का झालीस, ठीक आहेस ना... चल लवकर माझी मिटिंग आहे." लक्षकने तिला भानावर आणले.

"हो, अरे ही जी मिटिंग बोलतोय ना तू... त्याचे प्रेझेंटेशन मी देणार आहे आज, ते पण तुझ्यासमोर... म्हणूनच नर्व्हस झाल्ये थोडी." अनघाने स्पष्टपणे आपली भीती बोलून दाखवली.

"अरे, डोन्ट वरी आपण आधीही भेटलो आहोत ना... फ्रेंड आहोत.. कशाला घाबरते वेडी कुठली...ऑल द बेस्ट..." लक्षकने तिचा गेलेला आत्मविश्वास परत येण्यासाठी तिला धीर दिला.

दोघेही लगबगीनं प्रेझेंटेशनच्या रूम मध्ये पोहचले. प्रेझेंटेशन व्यवस्थित पार पडले आणि क्लायंटने डील सुद्धा डन केली. अनघाला खूप आनंद झाला, फक्त डील डन झाली म्हणून नव्हे, तर लक्षकची कंपनी आणि अनघाची कंपनी एका प्रोजेक्ट वर काम करणार होते, त्यात लीडर म्हणून लक्षक आणि अनघाची निवड केली होती. लक्षकही मनातून सुखावला होता. त्याने तसे दाखवले नाही, पण त्याच्या मन:पटलावर उभारलेले ते सुखाचे चित्र अनघाने बरोब्बर हेरले होते. आता दोघेही

सोबत काम करणार, दोघेही सोबत वेळ घालविणार, ही कल्पनाच मुळी सुखावह होती. मग वास्तव्यात कसं असेल याची कल्पनाच न केलेली बरी. आज अगदी चांगली, झकास झोप लागणार होती दोघांनाही... उद्यापासून सोबत जे काम करायचे होते त्यासाठी.

इकडे आरव आणि नेत्राची मैत्रीही वाढत होती. आरव नेत्राला काही हवे नको, आवर्जून विचारायचा. नेत्राही त्याची आपुलकीने विचारपूस करायची.

अनघा - लक्षक यांचे कामानिमित्त भेटीगाठी होतंच होत्या. पण मैत्री असावी, हाच हेतू दिसत होता. तश्यातच २-४ महिने उलटले. आतापर्यँत त्यांच्यात एक चांगली बॉडिंग झाली होती. दोघे एकमेकांना व्यवस्थित समजून घेत होते. एकमेकांच्या आवडीनिवडी एकमेकांना ठाव झाल्या होत्या. आणि तो प्रोजेक्ट जवळजवळ ५ महिने चालला. आता फक्त फिनिशिंग बाकी होती. ५ महिन्यात अनघा आणि लक्षक यांच्यात एक नातं फुलत होतं, प्रेमाचं नातं बहरत होत. एकमेकांनी

एकमेकांविषयी जाणलं होतं. मनातलं ओळखलं होतं. पण पुढाकार तो कोणी घेतलाच नाही. शेवटी तो दिवस उजाडला...

"आजचा प्रोजेक्टचा शेवटचा दिवस, you both together did well in limited time " अनघाच्या बॉसने कॉम्प्लिमेंट दिली, त्यावेळी ती भानावर आली. प्रोजेक्ट संपला की तो त्याच्या मार्गी असेल, मी माझ्या. मग मनात असून ओठांवर आणले नाही तर मी चुकी केली, असा पश्चाताप नंतर नको. आजच मी त्याला माझ्या मनातलं सांगेल, जे होईल ते बघून घेईल... अनघाने शेवटी निर्णय घेतलाच.

"अनघा... लक्ष कुठे आहे तुझं? मी म्हणतेय प्रोजेक्ट कम्प्लिट झाल्याच्या खुशीत मी पार्टी ठेवली आहे, आज रात्री. You and Lakshk are the starlight of party, come with preparation " अनघाच्या बॉसने तिला पुन्हा भानावर आणत पार्टीचे निमंत्रण दिले. लक्षक चेही सारखेच हाल होते. त्याचे एक मन त्याला सतावत होते, बोलून टाक... आजचा शेवटचा दिवस आहे. दुसरे मन बोलत होते... नको, उगाच रिस्क घेऊ नकोस, तिला गैर समज झाला तर फ्रेंडशीप पण

तुटेल." लक्षकही इथे द्विधा मन:स्थितीत फसला होता, काय करावे ते त्याला सुचत नव्हते.

मग आता थेट पार्टीलाच दोघे एकमेकांना भेटून आपल्या मनात काय आहे, याचा खुलासा करणार होते. अनघा तयार झाली.. तिने रॉयल ब्लू कलरचा गाऊन घातला होता आणि त्यावर मॅचिंग अशी डायमंडची कानातले घातले होते. हातात डायमंड ब्रेसलेट होते. आणि केस मोकळे ठेवले होते. तिच्या नाजूकश्या ओठांवर फिकट गुलाबी रंगाची लिपस्टिक तिने लावली होते. तिच्या कातील नजरेला अजून ठसवून दिसण्यासाठी डोळ्यांना आयलायनर लावले होते. अगदी चंद्रालाही लाजवेल असे तिचे मोहक सौंदर्य आज अगदी खुलून दिसत होते. लक्षकनेही लाईट ब्लू कलरचा ब्लेझर घातला होता, त्याच्यावर तो कलर चांगला उठून दिसत होता. आज दोघेही नटून आले होते कारण आजच्या पार्टीचे खरे स्टार तेच तर होते. संध्याकाळी पार्टीत आगमन झाल्यावर त्या ठिकाणी आलेल्या प्रत्येकाचे या दोघांवरून लक्ष हटतचं नव्हते.

नंतर पार्टीला सुरुवात झाली, अनघाच्या अन लक्षकच्या बॉसनी प्रोजेक्ट अँड पार्टीचे कारण स्पष्ट करून या दोघांची

ओळख सगळ्यांना करून दिली. केक कटिंग झाल्यानंतर पार्टीची खरी सुरुवात झाली. मग हळू हळू ड्रिंक्स घेणं, डिस्को डान्स या सगळ्या गोष्टी चालू झाल्या. आणि त्यातच रात्रीचे ११ वाजले. पण इतका वेळ एकत्र असूनही त्या दोघांना हवा तसा एकांत मिळाला नाहीच. पार्टी खूप उशिरापर्यंत चालली. अनघाला राहत्या फ्लॅटवर जायला कॅब नव्हती. काय करावे, याच विचारात ती गुंतून गेली होती.

तेवढ्यात पाठीवर कोणाचा तरी हात जाणवला. मागे वळून पाहिले तर तो लक्षक होता. मग तिला थोडेसे हायसे वाटले.

"काही प्रॉब्लेम?? " अनघाचा रडवेला झालेला चेहरा बघून लक्षकने विचारले.

"हा रे... खूप उशीर झाला आहे.. मला माझ्या फ्लॅट वर जायला कॅब नसेल या वेळी. कशी मॅनेज करू, काही कळतच नाही." अनघाने आपली अडचण सांगितली.

"अरे यार, एवढंच ना... इतकी काय घाबरते. मी आहे ना... माझी बाईक आहे, सोडेन मी तुला नीट. आता तर झालं, काळजी करू नकोस जास्त. " लक्षकने अनघाला दिलासा देत म्हटले. मग अनघाचाही मूड ठीक झाला आणि मोकळेपणाने

ती पार्टी एन्जॉय करू लागली. शेवटी बॉसने पार्टी संपल्याचे जाहीर केले आणि सर्व आपापल्या घरी जायला निघाले.

"लक्षक, बाईक जास्त फास्ट नको घेऊस... मला भीती वाटते." अनघाने बाईकवर बसता बसता सांगितले.

"हो गं, भीत्रूबाई... अगदी कासवाच्या गतीने नेईल तुला घरी, बस का? " लक्षकने टोमणा मारतच तिला बाईकवर बसायला सांगितले.

एकदाची बसलीच, सगळं सावरून नीट. लक्षकने गाडी चालू केली. अनघाच्या मनात काहीतरी चाललं होतं, खांद्यावर हात ठेवू कि नको.. उगाच ह्याला काही तरी वेगळंच वाटलं तर... तिच्या विचारांची मालिका पुढे जायला आणि बाईकसमोर एक भला मोठ्ठा खड्डा यायला एकच गाठ पडली. त्यामुळे कळत नकळत का असेना... आधारासाठी अनघाने लक्षकच्या खांद्यावर हात ठेवला. तो पहिला स्पर्श होता, लक्षकही या स्पर्शाने सुखावला. अनघाचे घर येईपर्यंत त्यांच्यामध्ये शांतता होती. दोघांच्याही मनात विचारांची वादळे उठली होती. तेवढ्यात अनघाचे घर आले. लक्षकने आवाज देऊन अनघाला विचारातून बाहेर आणले.

"ओ, मॅडम चला आले आपले घर? " लक्षकने अनघाची विचारांची तंद्री भंग करत तिला जागे केले.

"काय, कसला एवढा विचार करतेय? " लक्षकने अनघाला विचारले.

आढेवेढे घेत अनघाने त्याला सांगितले,

"काही नाही रे, आजची आपली कामानिमित्त शेवटची भेट, नंतर कधी भेटू सांगता येणार नाही."

लक्षकलाही असेच काहीतरी वाटत होते, म्हणून अनघाचे बोलणे ऐकून तो थोड्यावेळासाठी सुन्न झाला.

भानावर येऊन अनघा लक्षकला म्हणाली, "चल, एनिवे खूप उशीर झाला आहे, काळजी घे स्वतःची, थँक्यू गुड नाईट."

"हो तू पण. चल नीट जा, गुड नाईट." लक्षक काही बोलायच्या मनःस्थितीत नव्हता.

बाय बोलून अनघा आपल्या घराकडे जायला वळाली, तरी अजून तिला वाटत होते, धावत जाऊन पाठी लक्षकला सगळ्या फीलिंग सांगाव्या. लक्षकही अजून सांगू कि नको, या द्विधा मनःस्थितीत होता.

तेवढ्यात एकाच वेळेला अनघा पाठी वळून "लक्षक " अशी हाक मारली आणि लक्षकनेही "अनघा". दोघांची नजरानजर झाली. डोळयातल्या भावना डोळयांना समजल्या आणि आसवे दाटली. न बोलता सगळंच उमजल होतं. प्रेम हे असंच असते... न बोलता सगळं काही समजते. फक्त डोळयातल्या भावना हृदयाशी मूकपणे संवाद साधतात आणि इतकंच ते सखोल असते. आता दोघांनाही फक्त एकदा बोलून त्या नात्याला एक आकार द्यायचा होता.

"लक्षक, सगळं तुझ्या समोर आहेच. पण तुला त्या शो मध्ये पाहिल्यावरच माझं मन तुझ्यावर बसलं होतं." अनघाने पुढाकार घेऊन कबुली दिली.

"अगं, आपण त्या दिवशी कॉफी घेतली ना सोबत... त्या दिवसापासून तू माझ्या मनात भरली होती." लक्षकनेही आपल्या मनातली बाजू साळूदपणे मांडली. दोघांनीही आपापले विचार मांडले होती, पण हे विचार त्यांना अगोदर मांडता आलेच नाही. आज "करो नाहीतर मरो" या धोरणावर चालून दोघांनीही बाजी मारली होती. लक्षक बाईकवरून उतरून अनघा जवळ गेला. रात्रीचे १२ वाजले असावेत. स्ट्रीट

लाईटचा तो मिणमिणता प्रकाश अन आकाशातला चंद्र त्यांच्या प्रेमाला साक्षीदार ठरला होता. त्याने अनघा समोर जाऊन तिचे हात आपल्या हातात घेतले आणि स्वतःच्या गुडघ्यांवर बसून तिला प्रपोज केला.

"अनघा, मी पाहिले तेव्हापासून तू माझ्या मनात भरली आहेस, माझ्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मला तुझी साथ हवी आहे, माझ्या प्रत्येक आनंदात आणि दु:खातही मला तू माझ्या आयुष्याचा "जोडीदार" म्हणून हवी आहेस, तू माझी होशील का?? ? " एवढे बोलून त्याने अनघाकडे भरल्या डोळयांनी पाहिलं.

अनघा अजूनही स्वप्नात होती. तिला वाटत होते मी काय बघतेय हे गोड स्वप्न... कि नक्की वास्तव्य आहे, तिला लक्षकच्या त्या बोलण्याने पार गोंधळात टाकले होते.

"हो, नक्कीच…मला आयुष्यभरासाठी तू माझा जोडीदार म्हणून आवडेल. मीही तुला पाहिल्यापासून तू माझ्या मनात होतास." अनघाने लक्षकचे प्रपोजल स्वीकारत त्याला मिठी मारली. नंतर दोघांनाही जाणीव झाली खूप काळ लोटून गेला

असावा, आपण एकमेकांच्या बंधनात अडकून, म्हणून स्वतःहून अनघा लाजत लक्षक पासून दूर झाली.

"घरी पोहचल्यावर मला कॉल करून कळवं " अनघाने लक्षकला सांगितले.

"हो, नक्कीच राणीसाहेब. आपका हुकूम सर आँखो पर." लक्षकनेही तिची थोडी मस्करी करीत तिला लाजविली.

घरी आल्यानंतर अनघा आज स्वतःला आरश्यात न्याहळत होती. मधेच खुदकन हसत होती. तिला तिचा हा आनंद डॅड नाहीतर तिच्या नेत्रा आंटी सोबत शेअर करायचा होता, पण वेळ टळली होती... रात्रीचा १ वाजला होता. म्हणून उद्या सकाळी उठून त्यांना सांगेल, अशी स्वतःच्या मनाची समजूत घालून अनघाने स्वतःला बेडवर झोकून दिले आणि लक्षकच्या फोनची वाट पाहू लागली. सुमारे १० मिनीटात "लक्षक साने" हे नाव तिच्या मोबाईलच्या स्क्रीन वर झळकले. तिच्या चेहऱ्यावर पुन्हा तीच गुलाबी लाली खुलली. तिने फोन रिसिव्ह करून कानाला लावला. तोच समोरून लक्षकचा सुखद आवाज तिच्या कानाला भावला.

"ओ भावी मिसेस साने, पोहचलो मी अगदी सुरक्षित, आता झोपा खूपच रात्र झाली आहे, सकाळी भेटू."

"हो, हो मिस्टर साने गुड नाईट, स्वीट ड्रीम, झोप आता." अनघानेही तोडीस तोड उत्तर देऊन त्यालाही नमवले. आणि नंतर अनघाने "लक्षक साने"च्या नावात बदल करून फक्त "लक्षक" असे नाव सेव्ह केले आणि त्याला फेव्हरेट कॉन्टॅक्ट लिस्ट मध्ये ॲड करूनही मोकळी झाली.

त्या दोघांची ती रात्र नक्की झोपेत गेली की स्वप्नात ते सांगणं जरा कठीणच होतं. सकाळी सकाळी अनघाचा फोन वाजला. टेक्स्ट मेसेजचा अलर्ट होता तो. डोळे चोळतच तिने मोबाइल बघितला.

लक्षक : मॅडम गुड मॉर्निंग, उठा आता... अजून किती स्वप्नांत छळणार आहेस मला."

अनघानेही त्याला तसाच एक टेक्स्ट केला.

अनघा : "वा रे वा... चोराच्या उलट्या बोंबा नाही का साहेब? चला उठा आता, आवरून घ्या... भेटू नंतर."

एक दीड तासात पटापट आवरून अनघा ऑफिसला निघाली. तोच तिच्या बिल्डिंग खाली लक्षक त्याच्या बाईक सोबत दिसला. अनघाला मिळालेल्या या सरप्राईजमुळे तिचा आनंद गगनात मावत नव्हताच. मग दोघेही बाईक वर बसून ऑफिसला पोहचले. लक्षक रोज तिला ऑफिसला घेऊन जायचा आणि ऑफिस नंतर घरी सोडत होता. त्यांच्यात निर्माण झालेलं नातं आता बऱ्यापैकी फुललं होतं. आता लवकरच ती ट्रेनिंग संपणार होती.

# ५

एका दिवशी दोघेही कॉफी शॉप मध्ये बसले असताना... अनघाने विषयाला हात घातला.

"लक्षक, आपण घरी सांगायचे का आता? २-३ महिने होतं आले ना.."

"नाही असं फोन वर नको ना... आता आपण जाणार आहोतच ना मुंबईला.. मग भेटूनच सांगूया ना." लक्षकने अनघाला सावरत तिला दिलासा दिला.

मग आज अनघा आणि लक्षक मुंबईसाठी निघणार होते. तेवढ्यात अनघाने आरवला फोन केला.

"डॅड, आज निघतेय १ची फ्लाईट आहे."

पलीकडून आरव म्हणाला, "ठीक आहे, मी तुला एअरपोर्टला पिकअप करतो."

"नाही डॅड, एअरपोर्ट नको. तुम्ही मला सन कॅफेमध्ये भेटा ४ वाजता." अनघाने फर्मानच सोडले जणू काही.

आरवला कळून चुकलं, आता काही वाद घालून फायदा नाहीच.

"हो, चालेल... नीट ये. मी वाट बघतोय. "

नंतर आरवने फोन ठेवला.

तिथे लक्षकनेही फोन करून घरी सांगितले होते आणि त्यांनाही बोलावले होते. मग १च्या फ्लाईटने लक्षक आणि अनघा दोघेही मुंबईकडे रवाना झाले. यावेळी दोघांनीही एकमेकांशेजारची सीट बुक केली होती आणि सुदैवाने मिळालीही होती. त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. आणि नंतर थोड्याश्या थकव्याने अनघाचा डोळा लागला आणि ती लक्षकच्या खांद्यावर डोकं ठेवून झोपून गेली.

चक्क मुंबई येईपर्यंत लक्षक तिच्या सौंदर्याकडे एकटक पाहत होता आणि अजून तिच्या प्रेमात पडत होता. शेवटी आली एकदाची ती मुंबई. फ्लाईट लॅन्ड होणार, अशी सूचना दिली गेली. त्यामुळे अनघाची झोप उडाली. नंतर सगळ्या फॉर्मलिटी पूर्ण करून अनघा आणि लक्षक दोघेही कॅब करून निघाले. इकडे आरव अनघाला भेटायच्या खुशीत ४च्या अगोदरच म्हणजे पावणे चारलाच सन कॅफे मध्ये येऊन

पोहचला होता. आणि काहीतरी विचारात गढून गेला होता, तेवढ्यात त्याच्या टेबलवर टक टक झाली. त्याला वाटले अनघा आली, म्हणून भरल्या डोळ्याने त्याने वर पाहिले. पण तिथे अनघा नव्हती तर होती ती नेत्रा.

"काय कसं काय? आज चक्क सन कॅफे मध्ये?? " नेत्राने त्याला प्रश्न केला.

"हो, मुलगी येतेय. तिने बोलावले आहे, पण तू इथे कशी? "आरवने आपले उत्तर देऊन तिला प्रतिप्रश्न केला.

"हा, ते थोडंसं काम आहे म्हणून आली आहे." नेत्रानेही आरवची समजूत घातली. मग जास्त काही खोलात न जाता त्यांचे इथले तिथले बोलणे सुरु झाले.

"मग आता तब्बेत कशी आहे? कामाचा जास्त व्याप असेलच ना? वेळेवर सर्व औषधे घेतोस कि नाही?? " नेत्राने आरववर प्रश्नांची तोफ झाडली.

"हो गं, अगदी वेळेवर औषधे, जेवण सगळं सगळं. आणि थोडा जास्त व्याप आहेच कामाचा. पण आता मुलगी येईल ना मग बरं पडेल सगळं." आरवने नेत्राची समजूत काढत तिला

समाधान दिले. बऱ्याच वेळ निघून गेला, दोघेही बोलत होते. इकडच्या तिकडच्या गप्पा चालूच होत्या त्यांच्या. इथे अनघाला यायला १५ मिनिटे उशीर झाला, पण आरव नेत्राशी बोलण्यात गुंग असल्याने त्याला एवढं काही वाटलं नाही. नाहीतर एवढ्याला अनघाला चार-पाच फोन करून करून तिचा पण आणि त्याचा पण जीव कासावीस झाला असताचं. पण आता नेत्रा समोर होती म्हणून कि काय... अनघा ट्रॅफिक मध्ये असेल म्हणून उशीर होतोय, असा विचार करून त्याने आपला मोर्चा नेत्राकडे वळविला होता. एरवी आरव आणि नेत्राची विचारपूस फक्त फोनवर होत होती. ते दोघेही बऱ्याच दिवसाने किंवा जवळपास एखाद महिन्याने प्रत्यक्ष भेटले होते. म्हणूनच तो बोलण्यातला गोडवा आणि जिव्हाळा कायम होता. त्यामुळे त्या दोघांच्या मैत्रीमध्ये अजूनही ती एक नात्याची ओढ होती.

आरव आणि नेत्रा बोलत असतानाच अनघा लक्षक सोबत सन कॅफे मध्ये आली. ती आरवला पाहताच विचार करू लागली, कोणत्या लेडीशी डॅड बोलतात... कारण जे लेडी बसली होती आरव समोर तिची अनघाला पाठ होती. म्हणून

अनघा लक्षकला तिथेच थांबवून आरवच्या टेबलजवळ आली, तेवढ्यात आरवनेही तिला पाहिले आणि आनंदात तिला हाक दिली.

"बेटा, आलीस का?? किती उशीर झाला?? "

"हा डॅड, जस्ट आली... खूप ट्रॅफिक होतं आज, म्हणून वेळ झाला." आणि आरवने पुढे येऊन अनघाला मिठी मारली. जवळपास ६ महिन्यांनी त्या दोघांची भेट होत होती. तेवढ्यात नेत्राला तो आवाज ओळखीचा वाटला... म्हणून तिने पाठी वळून पाहिले... तर ती बागेतली अनघा होती. तिच्याही डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तिच्या आनंदाला पाराच उरला नव्हता. आरवच्या मिठीतून सुटताना तिने त्या लेडी कडे पाहिले... तिच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता...ती लेडी दुसरी तिसरी कोणी नसून.. तिची नेत्रा आंटी होती. तिने पुढे येऊन नेत्राला स्वतःहून मिठी मारली, नेत्रानेही तिला आसवे ओघळत मिठी मारली. त्या दोघी सुद्धा रडत होत्या. अश्रू आनंदाचेच होते ते.

पण आरव... आरव पुरता गोंधळून गेला होता. कारण त्याला लहानपणापासून अनघाची एक सवय ठाऊक होती. ती

कधीच अनोळखी माणसासोबत कम्फर्टेबल नसायची. आणि इथे चक्क नजारा उलटा होता. अनघा नेत्रा सोबत फक्त कम्फर्टेबलच नाही तर जास्तच कम्फर्टेबल दिसत होती. हे सगळं स्वप्न बघतोय कि नक्की घडतंय याचा ठावठिकाणा आरवला मुळीच नव्हता. तेवढ्यात नेत्रा आणि अनघाच्या खिदळण्याने आरवला वास्तव्याची जाणीव झाली.

"डॅड, ह्याच त्या बागेतल्या आंटी, मी पडले होते ना तेव्हा यांनीच मला उचलून बाकावर ठेवले होते आणि आम्ही आता मस्त मैत्रिणी सुद्धा झालो आहोत." अनघाने आरवला नेत्राची तिच्या बाजूने ओळख करून दिली.

"अच्छा, असं होय, तरी मी विचार करतोय कि तू आणि स्ट्रेंजरसोबत इतकी कम्फर्टेबल?? शक्य नाहीच." आरवने आलेली शंका अनघा समोर व्यक्त केली.

"पण डॅड, तुम्ही आंटीला कसे ओळखता?? " अनघाच्या तीक्ष्ण नजरेतून आरव आणि नेत्राचं मनमोकळेपणानं बोलणं सुटलं नव्हतंच.

"अरे बेटा, ती फार मोठी कहाणी आहे. पण असं समजून चाल, कि आज तुझा डॅडु तुझ्यासोबत आहे ना तो फक्त या

नेत्रामुळेच. काय तिचे आभार मानू कळत नाही." आरवने थोडक्यात अनघाला नेत्राची आणि त्याची ओळख सांगितली.

"अगं अनघा, असं काही नाहीये... मी फक्त माणुसकीच्या नात्याने यांचा जीव वाचवला." नेत्राने आपली बाजू सावरत अनघाला सांगितले.

"म्हणजे तेव्हा आंटी तुम्हांला माहित नव्हतं का कि हे माझे डॅड आहेत? " अनघाने अजून उत्सुकतेपोटी प्रश्न केला.

"नाही ग, मला असं काही ठाऊक नव्हतं." नेत्रानेही खरी कबुली दिली.

"पण डॅड आणि आंटी मी दोघांशी पण कट्टी आहे आता, मला तुम्ही सांगितलं सुद्धा नाही की तुमच्या कारचा अपघात झाला होता, आता कसे आहेत?? बरे झालात का? हे सगळं कधी झालं होतं? मला काहीच सांगितलं नाही ना तुम्ही..." अनघा रडवणीच्या स्वरात आपला मुद्दा मांडत होती.

आरवला या गोष्टीची कल्पना अगोदरपासून आली होतीच. त्यामुळे यावेळी तो अनघाला आणि तिच्या सर्व प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी एकदम तयार होता.

"अरे अनघा बेटा, तू तिथे बिझी होतीस आणि मी तुला सांगितलं असतं तर तू तुझं सगळं सोडून इथे धाव घेतली असती आणि मला तू असं केलेलं कधीच आवडलं नसतं. म्हणून मीच नेत्राला सुद्धा माझ्या या प्लॅन मध्ये घेतलं होतं, पण मला हे ठाऊक नव्हतं कि हीच तुझी गार्डन वाली आंटी आहे असं." आरवने सुद्धा हसत हसत अनघाला सर्व स्टोरी सांगितली. मग नेत्रानेही तिला तिच्या परीने सगळं समजावून सांगितले. पण ह्या सगळ्या गडबड आणि आनंदाच्या धक्क्यामुळे अनघाला लक्षकचा थोड्या वेळासाठी विसर पडला होता. पण जसे तिचे घड्याळाकडे लक्ष गेले, तेव्हा तिला पटकन काहीसे आठवले आणि आरव - नेत्राला तिने सांगितले,

"बरं... आता दोघे पण एकत्र आहेत मग मी काही सरप्राईज देणार आहे, चला डोळे बंद करा पटकन."

दोघांनी पण अनघा राणीसाहेबांचा हुकूम मानून पटापट डोळे बंदही केले. अनघाने लगेच लक्षकला फोन करून बोलावून घेतले. आणि लक्षकला स्वतःच्या आडोश्याला लपवून आरव आणि नेत्राकडे बघितले.

"डॅड, आंटी आता दोघे पण आपले डोळे उघडा... हे तुमचं सरप्राईज..."

आरव समोर एका मुलाला बघून थोडा गोंधळात पडला. पण नेत्रा, नेत्रा उठून लक्षकच्या जवळ गेली आणि लक्षकनेही नेत्राला मिठी मारली. अनघा आता खरी शॉक होती. तिला काहीच समजून येत नव्हतं. नेत्रा आंटी आणि लक्षक एकमेकांना ओळखतात, याचा खरा तिला मोठा धक्का बसला होता. मग त्याचे भेटून झाल्यानंतर, नेत्राने स्वतः लक्षकची ओळख करून दिली. "हा माझा मुलगा - लक्षक. आणि लक्षक ही अनघा...मी बोलले होते ना मागे कि माझी एक मैत्रीण आहे असं तीही आणि हे तिचे डॅड."

आता अनघा - लक्षक दोघेही लाजून चुर झाले होते. कारण आता उरलेल्या सगळ्या गोष्टींचा सामना या दोघांना करायचा होता.

आरवने अनघाची फिरकी घेण्याच्या विचारात तिला विचारले, " बेटा, तुझं काहीतरी सरप्राईज होतं ना... काय आहे ते - लक्षक??? "

अनघा थोड्या वेळासाठी निरुत्तर झाली. लक्षकने तिची बाजू सावरली.

"अंकल खरं म्हणजे आम्हांला माहीत नव्हतं कि तुम्ही दोघे एकमेकांना ओळखतात अगोदरपासून... म्हणून अनघा मला तुमच्याशी भेटायला घेऊन आली होती. "

"अच्छा... तिचा मित्र आहेस असं तू..." आरवने लक्षकची सुद्धा टर उडवायला घेतली.

नेत्राने अनघा आणि लक्षकच्या डोळ्यातले भाव एव्हाना वाचले होते.

तिची तंद्री भंग करत आरव म्हणाला, " नेत्रा, तू काहीतरी बोल ना..."

"मी काय बोलणार..जे आहे ते दोघांच्या सुद्धा डोळयांत स्पष्ट दिसून येतंय. काय रे पोरांनो... देताय ना कबुली आता सगळी..." नेत्राने अगदीच बरोब्बर जागी निशाणा साधला.

मग दोघांनीही त्यांची ओळख कशी झाली, ते कसे भेटले... मैत्रीच्या नात्याचे रूपांतर प्रेमात कसे झाले... सगळं आरव आणि नेत्रा समोर कबूल केले. डोळयांतले भाव बघून,

त्यांच्या प्रेमाला नाकारणं आरव आणि नेत्राला पटलं नाहीच. त्या दोघांनी सुद्धा दोघांच्या प्रेमाला मंजुरी दिली.

त्यानंतर दोघेही आपापल्या घरी आले. आज सगळ्यात जास्त खुश अनघा होती. कारण नियतीने काही असा एक डाव तिच्या आयुष्याचा मांडला होता, ज्यामुळे तिच्या आयुष्याला एक नवीन आणि आनंदमय कलाटणी येणार होती. हळूहळू गाठीभेटी वाढल्या. घरी येणं जाणं वाढलं आणि नंतर आरव आणि नेत्राने त्या दोघांचे लग्न करावे असा विचार केला. असंच एके दिवशी दुपारी, नेत्रा लक्षक सोबत आरवच्या घरी आली. आता नेत्राचा आरवच्या घरातील वावर वाढला होताच, म्हणून तिने लक्षक आणि आरवला हॉलमध्ये बसायला सांगून ती चहापाणीसाठी किचन मध्ये गेली. घरातील सगळा आवाज ऐकून अनघा सुद्धा तिच्या बेडरूम मधून बाहेर आली. मग नेत्रा सगळ्यांसाठी चहा नाश्ता घेऊन आली.

"तसं मला कोणी विचारलं नाहीच, न सांगता मी आज लक्षक सोबत आली आहे तेही दुपार-दुपार? " नेत्राने रोखक नजरेने आरव आणि अनघाला विचारले.

"अगं, काय विचारायचं त्यात... आमचं जसं हे घर, तसं तुझं सुद्धा आहे. कधीही ये आणि जा... " आरवने तिला तिचा हक्क दाखवून देत सांगितले.

"हो रे आरव, मान्य आहे ते मला... पण आता मी जी आलीये ती काहीतरी ठरवूनच." नेत्राने आपण मनात काहीतरी योजले आहे, हे दाखवून उत्सुक व्हावे म्हणून एक डाव साधला.

"काय, असं काय ठरवलं आहे तुम्ही आंटी? " अनघाने उत्सुकतेने नेत्राला विचारले.

"अगं, अनघा... असं विचारून ती सांगेल तर शप्पथ.. मी स्वतः रस्ताभर तिला खोदून खोदून विचारले, पण परिणाम शून्य..." लक्षकने अनघाला सावरून सांगितले.

शेवटी आरवने पुढाकार घेतला आणि नेत्राला विचारले, "काय झाले ग? तशी आज जरा जास्तच आनंदात दिसतेय तू? लवकर सांग आम्हांला पण... आम्ही पण खुश होऊ...!"

"हो, हो सांगते. काही तसं जास्त विशेष नाहीये... पण मला वाटतं आता बऱ्यापैकी लक्षक आणि अनघा दोघांनीही एकमेकांविषयी जाणून घेतले असेलच, मग लग्नाची बोलणी

करायला आणि लग्नाचा विचार करायला काही हरकत आहे का?? " नेत्राने हसऱ्या चेहऱ्याने सगळ्यांना ही गोड बातमी सांगितली. अनघा लाजेने चुर होत तिच्या रूम मध्ये पळाली आणि लक्षकही एवढी मोठी आनंदाची बातमी ऐकून मनातून सुखावला होता. आरवने लगेच नेत्राच्या वाक्याला उचलून धरत बोलला, "मी पण दोन तीन दिवसांपासून ह्याचाच विचार करत होतो."

मग अखेर त्या दोघांची लग्नाची तारीख ठरली. दोघांनाही मनोमन वाटतं होतं, लग्न साध्याच पद्धतीने करावं, जास्त ताम झाम नको होता. मग ती लग्नाची शॉपिंग, साड्या - दाग दागिने, सगळी धावपळ चालू झाली. आणि मग लग्नाची तारीख जवळ येऊ लागली. तश्यातच त्यांच्या इच्छेनुसार... अगदी जवळच्या नातेवाईकांच्या मंगल आशीर्वादाने अनघा आणि लक्षक यांचा शुभविवाह पार पडला. मग दोनेक दिवसांनी अनघा आणि लक्षक यांच्या लग्नाचे रिसेप्शन एका हॉल वर ठेवला होता. संध्याकाळी तो कार्यक्रम जरी असला तरी सकाळ पासून घरी धडपड सुरू होती. मग संध्याकाळी दोघे तयार होऊन मोठ्या गाडीतून आरव आणि नेत्रा सोबत हॉल वर पोहचले. हॉल मस्त

अनघाच्या आवडीच्या व्हाइट लिलीने सजवला होता. स्टेजवर मखमली गुलाबी कलरचा कापड हवेचे झोके खात होता. त्यावर मोठ्या अक्षरात "Lakshak weds Angha " असे लिहिले होते. जशी अनघा आणि लक्षकने त्या हॉलच्या दरवाज्यातून एन्ट्री घेतली... सगळं हॉल टाळयांच्या आवाजाने दुमदुमला होता. अनघाने मोरपीसी कलरचा स्लीव्हलेस गाऊन घातला होता, आणि मोकळया सोडलेल्या केसांवर तो डायमंडचा बसविलेला क्राऊन तिला अगदीच स्वप्नसुंदरी जनिक उठून दिसत होता... आज ती राजकुमारी सारखी खुलून दिसत होती. लक्षकने रॉयल ब्लु कोट घालून आपली शान वाढवली होती. मग थोड्याच वेळात कार्यक्रम सुरु झाला... पाहुणे येत होते, भेटी होत होत्या... नवीन नाती जाणत होते.. आणि फोटो काढून आठवणी सजवत होते. हे सगळं होत असतानाच... अनघाला डोळयासमोर घेरी आली. आणि तिने लक्षकला आधारासाठी हात धरला. इथे लक्षकला या गोष्टींचा काही थांगपत्ताच नव्हता. त्याने अनघाला मस्करी करून चिडवायला घेतले.

"काय मिसेस साने, हे असं पब्लिकमध्ये हात पकडतेय.. कोणी पाहिलं तर काय वाटेल गं त्यांना..." लक्षकने तिला जरा टोमणा देतच चिडवलं.

त्याने सांगितल्यावर तिने हात बाजूला घेतला ...... आणि

थोड्याच वेळात ती लक्षकच्या पायाखाली कोसळली. कोणालाही काहीच कळले नाही. नंतर थोड्या सेकंदाने लक्षकला आभास झाला, तेव्हा त्याला घामच फुटला. त्याने खाली वाकून अनघाला हाक देऊन उठवत होता.

"अनघा, अनघा उठ, काय झाले? "

तेवढ्यात नेत्रा आणि आरव धावत स्टेजवर पोहचले आणि लक्षकने वेटरला सांगून एक ग्लास पाणी मागविला. अनघाच्या डोळ्यावर पाणी मारूनही अनघा शुद्धीवर येत नव्हती. मग लक्षकने तिला उचलून रूममध्ये नेले. आणि नंतर आरव डॉक्टरला फोन लावणार इतक्यात, नेत्रा आरवकडे आली..

# ६

" आरव, अनघाला शुद्ध आली आहे आता, ये चल... थोडी थकलेली दिसतेय मला ती." नेत्राने आरवला सांगितले.

"तू हो पुढे, मी जरा तिला खायला घेऊन येते." नेत्राने आरवला सांगून ती जरा अनघाला खायला आणण्यासाठी गेली. मग थोडंसं खाल्ल्यानंतर अनघाला तरतरी आली. आणि ह्या सगळ्या धावपळी मुळेच तिला चक्कर आली होती... असा विचार करून कार्यक्रम आटोपता घेतला कारण अनघाला आज विश्रांतीची गरज होती. मग घरी आल्यावर लक्षकने अनघाला विश्रांती घ्यावी असं सुचवलं. गरम पाणी त्याने स्वतःच्या हाताने करून आणलं आणि अनघाला त्यात पाय सोडून बसायला सांगितलं. आरवने लक्षक करीत असलेल्या गोष्टी टिपल्या होत्या आणि त्याने नेत्राला हळूच नजरेने खुणावून पाहायला लावले.

तसे लक्षक आणि अनघा समोरच आरवने खोटा गळा खाकरून नेत्राला सांगितले,

"अगं, आत्ता माझी सगळी चिंता मिटली. अनघा खूपच लकी आहे... तिला लक्षक सारखा गुणी आणि संस्कारी जोडीदार मिळाला... माझ्या मुलीच पुढचं लाईफ खरंच खूप आनंदी असेल."

"आरव, फक्त अनघा लकी नाहीये... लक्षकला सुद्धा अनघा सारखी केरिंग, हेल्पफुल वाईफ मिळाली." नेत्रानेही बाजू सांभाळत आरवला लक्षात आणून दिलं. मग असेच आनंदात २-४ महिने गेले आणि आता हे चौघे सुद्धा एका छताखाली गुण्यागोविंदाने राहू लागले. इथे अनघा आणि लक्षक मध्ये जवळीक वाढत होती. आरव आणि नेत्रा मधली मैत्री सुद्धा खोल होत होती. अनघा आणि लक्षकला आरव आणि नेत्राला एकत्र बघून खूप आनंद व्हायचा. मग कधी तरी हे दोघे आरव आणि नेत्रासाठी डिनर नाहीतर अजून काही... अशी सरप्राईज प्लॅन करायचे. आरव आणि नेत्रा काही कमी नाही. तेही लक्षक आणि अनघाला एकांत मिळावा... म्हणून दोघे बाहेर असायचे. शक्यतो विकेंडला मोस्टली ते दोघे बाहेर असायचे आणि इथे अनघा आणि लक्षकला वाटायचं की

आम्ही दोघे त्यांना क्लोज आणतोय ......पण या उलट नेत्रा आणि आरव त्या दोघांना क्लोज आणत होते.

एक दिवस चौघांनी मिळून हा विकेंड घरात सेलिब्रेट करायचा ठरवलं. सगळं काही बाहेरून मागवणार होते. लक्षक, आरव आणि अनघा यांनी आज हॉलिडे घेतला होता. सकाळी सगळं आरवाआरव झाल्यावर नेत्रा आणि अनघाने अगोदरच ठरवलं होतं, त्यामुळे मग अनघाने त्यांच्या लग्नाची DVD लावली होती. चाललं ते सगळं ३-४ तास. सगळं आठवलं... आणि त्यातच दुपार झाली. जेवणं झाली नंतर थोडा वेळ आराम करायला सगळे आपापल्या रूम मध्ये निघून गेले.

संध्याकाळी चहा आणि थालीपीठचा बेत होता. नेत्रा लवकर उठून थालीपीठ बनवायच्या तयारीला लागली होती. अर्ध्या एका तासाने अनघा सुद्धा किचनमध्यें आली आणि नेत्राच्या मदतीला लागली. १५-२० मिनिटात गरमागरम चहा आणि थालीपीठ रेडी झालं. तेवढ्यात आरव आणि लक्षक दोघे सुद्धा हॉल मध्ये थालीपीठाच्या घमघमणाऱ्या वासामुळे येऊन पोहचले होते. अनघा आणि नेत्रा चहा आणि थालीपीठच्या प्लेट घेऊन हजर झाल्या. आणि सगळयांनी थालीपीठ वर ताव

मारला. खुप दिवसांनी चौघे एकत्र होते. गप्पागोष्टी रंगल्या होत्या. चहा संपला होता म्हणून अनघाने चहाचे कप एकत्र करून नेऊन ठेवायला ट्रे मध्ये भरले आणि किचन मध्ये गेली. किचन मध्ये पोहचताच तिला चक्कर आली, पण बेसिनच्या कडेला हात पकडून तिने स्वतःला सावरलं... नंतर उलटी सारखं जाणवायला लागलं म्हणून बेसिनचा नळ चालू करून तिने तोंडावर पाणी फवारलं. आणि उलटी झालीच, तिला वाटले अजीर्ण झालं असावं... पण उलटी मधून बेसिनमध्ये रक्त दिसताच तिचा तोल गेला आणि ती खाली पडली. हातातल्या ट्रेचा आवाज झाला... त्या बरोबर काहीतरी अघटित झालं, असं त्या तिघांना वाटलं आणि त्यांनी किचनकडे धाव ठोकली. अनघाला फरशीवर पडल्याचे पाहिल्यावर नेत्राला घामच सुटला. लक्षकने आरवच्या मदतीने तिला रूममध्ये बेडवर झोपवली. नेत्रा लिंबूपाणी घेऊन तिला उठविण्याचा आणि शुद्धीवर आणायचा प्रयत्न करीत होती. आरवने डॉक्टरला फोन लावला, "हॅलो डॉक्टर राणे, मी आरव कुलकर्णी. जरा लवकर या माझ्या घरी, अनघाला चक्कर येऊन तिची शुद्ध हरपली आहे."

लक्षक रडवेल्या चेहऱ्याने अनघाचे हात घासत होता. आरवला टेन्शन येत होतं, डॉक्टर अजून आले नाहीत म्हणून तो हॉलमध्ये एकसारख्या येरझाऱ्या घालीत होता. नेत्राने त्याच्या पाठीवर हात ठेवला आणि "सगळं काही ठीक होईल ", असे नजरेनेचं समजावले. एकदाचे डॉक्टर आले, त्यांना घेऊन आरव तडक अनघाच्या खोलीत गेला. डॉक्टरांनी अनघाला तपासल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर टेन्शन आले. त्यांना बघून आरवही बुचकाळ्यात पडला. अखेर डॉक्टरांनी शांतता भंग करीत अनघाबद्दल सांगायला सुरुवात केली.

"मिस्टर आरव... जरा सिरीयस आहे. अनघाला ब्लड कॅन्सर असू शकतो, टेस्ट करायला हवी." डॉक्टर म्हणाले.

आरव सोबत नेत्रा घाबरून गेली, त्यांच्या पायाखालची जमीन सरकल्याचा त्या दोघांनाही आभास झाला. लक्षकचे काय ते विचारूच नका. लक्षक पार सदम्यात गेला. अनघा अजून शुद्धीवर आलीच नव्हती. डॉक्टर काय बोलत होते, याचे कोणाला काही भान नव्हते, पण आरवला साद घालीत डॉक्टरांनी त्याला सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली. तिच्यावर जातीने लक्ष ठेवण्याचे वचन दिले, आणि लवकरात

लवकर तिला पुर्णपणे बरी करण्याची हमी दिली. डॉक्टर निघून गेले. घरात अगदी स्मशानसम शांतता होती. कोणालाच काही सुचत नव्हते, पुढचं सगळं जग अंधारलेलं दिसत होतं. लक्षक वास्तव्याशी जुळवून घेऊ शकत नव्हता. त्याला त्याच्या लग्नाच्या वेळी घेतलेले सात फेरे आणि त्यासोबत तिच्याशी एकनिष्ठ राहून संकटात तिच्या सोबत सामना करण्याचे दिलेले वचन आठवू लागले. त्याला काहीच समजून येत नव्हते. तो स्वतः सुद्धा ह्या सत्याला स्वीकारू शकत नव्हता.. मग अनघा?? जेव्हा अनघाला हे सगळं समजेल तेव्हा तिला सावरायला कोण पुढे येईल? तिला धीर कसा द्यावा?? या सगळ्या प्रश्नांनी उत्तरे आज सापडत नव्हती. काय करावं, हे कोणालाच सुचत नव्हतं. डोळ्यासमोर फक्त एक गडद अंधार दिसून येत होता. तेवढ्यात अनघाला जाग आली. उठण्याची ताकद नव्हती, म्हणून तिने लक्षकला आवाज दिला, पण लक्षक अश्या विचारात गढून गेला होता, कि अनघा त्याला साद घालतेय, हेही त्याला उमजले नाही. मग नेत्राला हलकीशी जाणीव झाली, तेव्हा तिने सर्वांना इशारा केला आणि सगळे तिच्या बेडपाशी जमले.

"आता कसं वाटतंय अनघा? " नेत्राने आपुलकीने चौकशी केली.

"हो, आता मस्त आहे... अगं आठवड्याचा थकवा आता निघाला आणि त्यामुळे अशक्त होऊन पडली असं वाटते. पण पुढचं काही आठवत नाही डॅड..." अनघाने जेवढं आठवत होतं ते सांगण्याचा प्रयत्न केला.

अशक्त होऊन पडली... असं बोलल्यावर सगळ्यांना जाणीव झालीच कि आता हिच्यापासून लपवले तरी काही प्रॉब्लेम नाही. आरव घसा खकारत पुढे आला आणि तिच्यासमोर बसला. आणि तिचे हात त्याने त्याच्या हातात घेतले... मोठ्या कौतुकाने तिच्या डोळयांत पाहिले. पहिल्यांदा अनघाला काही समजेना...

"डॅड, काय झाले... असे का दिसताय?? काही झालं आहे का? " अनघाला सहन झाले नाही, म्हणून न राहवून तिने आरवला विचारले.

"काही नाही बेटा... असंच पाहतोय" आरवने समजुतीच्या स्वरात अनघाला समजावले.

"नाही डॅड, तुम्ही काहीतरी लपवताय माझ्यापासून... मला सांगा ना..प्लीज डॅड..." असं बोलून अनघाने रडायला सुरु केलं.

तिची ही व्याकुळता पाहून अखेर आरव आणि नेत्रा, लक्षक यांनी तिला तिच्या आजाराबद्दल सांगायचे ठरवले.

"अनघा... आज तुला जी चक्कर आली आणि तुला जो अशक्तपणा आला होता, त्यामुळे तुला उद्या माझ्यासोबत चलून टेस्ट करावी लागेल." आरवने हिम्मत करून अनघाला सांगितले.

"डॅड, टेस्ट कशाला, ते मला थोडं काही पचलं नसेल, म्हणून असं झालं असेल." अनघाने आरवला विचारात गुंफण्याचा प्रयत्न केला.

"हो गं, ते डॉक्टर सांगत होते जरा टेस्ट करून घ्या... हिमोग्लोबिन कमी झालं असेल... म्हणून तुला वीकनेस आला होता." नेत्राने अनघाची समजूत काढत तिला सांगितले.

पण लक्षक... तो तर अजून धक्क्यातून सावरला नव्हता. तो जर जास्तच शांत झाला होता, पण त्याचं हे असं शांत होणं.. अनघाच्या नजरेतून सुटले नव्हते.

"लक्षक... तुला काय झाले आहे?? ठीक आहे ना... असा नर्व्हस का दिसतोय?? ? " अनघाने खूप साऱ्या प्रश्नांचा मारा लक्षकवर केला.

मग नेत्राने लक्षकची बाजू सावरीत अनघाची समजूत घातली.

"काही नाही गं, तुला जरी खरचटलं ना तरी त्याला त्या वेदना सहन होणार नाहीत... म्हणून जरा तो डिस्टर्ब आहे." नेत्राने अनघाला समजूतीच्या स्वरात सांगितले. मग अनघानेही जास्त काही आढेवेढे न घेता नेत्राच्या बोलण्यावर संमती दिली. इकडे आरव - नेत्रा आणि लक्षक तिघेसुद्धा खूप घाबरले होते. अनघाला या सर्व गोष्टींचा खुलासा कसा करावा, याबद्दलच त्यांच्या ध्यानीमनी येत होतं. पण आरवने हिमोग्लोबिनच्या नावाखाली तिला टेस्ट करण्यासाठी तयार करून वेळ मारून नेली होती. पण रात्रभर त्या तिघांनाही तेच टेंशन होतं आणि त्यातच सकाळ उगवली, पण त्या तिघांच्या मस्तकावरची ती

चिंतेची रेघ मिटण्यापेक्षा अधिकच दाट झाली. अनघाने आज ऑफिसला सुट्टी घेतली होती आणि ठरल्याप्रमाणे ती तिच्या डॅड सोबत हॉस्पिटलमध्ये जाणार होती. लक्षक ह्या सगळ्या गोष्टीचा सामना करू शकत नव्हता, म्हणून त्याने महत्वाच्या मिटिंगचा बहाणा करून घरी राहिला. आरवसोबत अनघा गेली, टेस्ट करून आली, रिपोर्ट यायला अजून वेळ होता. घरी नेत्रा आणि लक्षकचे सुद्धा मन लागत नव्हते. त्यांनी देखील हॉस्पिटलकडे धाव घेतली. फायनली १ तासात रिपोर्ट आला, डॉक्टरांनी अनघा आणि आरवला केबिन मध्ये बोलावून घेतले. तेवढ्यात नेत्रा आणि लक्षक सुद्धा येऊन पोहचले, त्यांच्या मागोमाग ते सुद्धा डॉक्टरांच्या केबिन मध्ये गेले.

डॉक्टरांनी रिपोर्ट पाहिले आणि एक दीर्घ श्वास घेऊन ते अनघासमोर वळाले.

"अनघा... आज काल टेकनॉलॉजि खूप वाढली आहे, त्यामुळे आपण कुठल्याही आजारावर विजय मिळवू शकतो... पण यात सगळ्यांत महत्वाची भूमिका ही आजारी माणसाची असते, त्याने हार न मानता झुंज चालू ठेवली, तर विजय नक्कीच त्याचा असतो." डॉक्टर बोलत होते. आणि अनघा...

ती अगदी गोंधळलेल्या नजरेने ते सर्व ऐकत होती. तिच्या मनात चालले होते ...... ह्या सगळ्या गोष्टी मान्य.. पण मला का सांगताय? काही समजत नाहीये. मला हे कोडं उलगडत नाहीये."

धीर करून अनघाने डॉक्टरांना विचारलेही..." डॉक्टर i can respect your feelings, but why are you talking this with me? "

एव्हाना अनघाला कळून चुकले होते, पाणी कोठेतरी मुरत होते. उलटी झाली, डॉक्टर आले.. डॅड, नेत्रा आंटी आणि लक्षक सगळे जरा जास्तच शांत होऊन गेले. कसली तरी चिंता त्यांच्या कपाळावर दिसून येत होती आणि आता... लक्षक त्याची मिटिंग सोडून इथे आंटी सोबत आला..? का?? काही सिरीयस असेल का?? ? अश्या सगळ्या प्रश्नांनी अनघाच्या डोक्यात काहूर माजवला होता.

नेत्राने तिच्या पाठीवर हात फिरवत तिला भानावर आणले, पण आज तो हातांचा स्पर्श मायेचा नव्हता... त्यात दुःख, काळजी, चिंता या सगळ्या गोष्टी जाणवल्या.. आणि हे काही अनघाच्या नजरेतून सुटले नाही.

शेवटी डॉक्टरांनी अनघाला सांगितले, "सॉरी अनघा, but i have to tell you that you are suffering from Blood cancer and you are hopefully at initial stage, we can heal you. God bless you "

हे ऐकून अनघाच्या जीवावर काय बेतली असेल, ते तिचं तिलाच कळलं नाही. तिला हे ऐकून बधिर झाल्यागत झालं. आजपर्यंत जगलेलं सगळं आयुष्य एका टप्प्यात समोर आलं... पुढचं भवितव्य अधांतरी लटकलेलं भासू लागलं. आणि त्याच विचारात ती हरवून गेली. रडू कि काय करू, सगळं सुचेनासे झाले. नंतर पाठून लक्षकने तिला कवेत घेतले आणि डोळ्यांनीच शाश्वती दिली. लक्षक आणि नेत्रा अनघाला घेऊन गाडीत आले, तोपर्यत आरवने डॉक्टरांशी बोलून औषधं आणि बाकी सगळ्या गोष्टी विचारून घेतल्या. घरी परतताना भयाण शांतता होती. कोण, कोणाशी बोलू शकत नव्हते, सगळे जण त्या देवाला अनघाच्या दीर्घायुष्यासाठी विनवणी घालीत होते. जशी अनघा घरी पोहचली, तिने स्वतःला तिच्या रूम मध्ये बंद करुन घेतले. पण त्यामुळे इथे आरव-नेत्रा आणि लक्षक यांच्या जीवाची घालमेल झाली. पण मिळालेल्या धक्क्यातून तिला

सावरणे आणि स्वतःला थेरेपीसाठी तयार करणेही तितकेच गरजेचे होते. म्हणून तिघांनी सुद्धा तिच्या ह्या गोष्टीला विरोध केला नाही.

इथे अनघाने रूमचा दरवाजा लावल्यानंतर, ती आरश्या कडे गेली. स्वतःला निहारून पाहिले... खूप शंका होत्या... ब्लड कॅन्सर आणि मला?? शक्य आहे का हे?? एका रिपोर्ट वर भरोसा ठेवू का?? फक्त चक्कर आली म्हणून डायरेक्ट ब्लड कॅन्सर?? तिला काहीच उमजत नव्हते. पण तिला या वेळी आलेल्या उलटीने तिला उत्तर दिले. मळमळल्यासारखं झाल्याने तिने बेसिन कडे धाव घेतली आणि त्यावेळी तिला रक्ताच्या उलट्या झाल्या. त्यावेळी तिला पडलेल्या कैक प्रश्नांची उत्तरे सापडली. भविष्य अंधारमय दिसत होते, पण ना कॅन्सरच्या पेशन्टमध्ये खूप सकारात्मक विचार दिसून येतात, अनघा याला अपवाद नक्कीच नव्हती. सरळ तिने एक डायरी आणि पेन घेऊन तिच्या बेडवर बैठक मांडली. आणि नंतर ती बराच वेळ विचारांच्या तंद्रीत व्यस्त होती. त्याचबरोबर ती त्या डायरीच्या पानावर काहीतरी खरडत होती. जवळपास २-अडीच तासानंतर ती बाहेर आली. तसा अर्धा विजय तिच्या

मुखावरील हास्यमध्ये दिसत होता. तिघांनाही तिला आनंदी बघून, त्यांचा जीव सुखावला होता. तिने क्रमाने डॅड, आंटी आणि लक्षकला मिठी मारली आणि तिने तिघांपुढे तिच्या डायरीचे एक पान धरले. तिच्या चर्येवरील ती हास्याची लकेर खूप काही सांगत होती. ना जाणे कसे, पण तिच्या हास्यामुळे त्या तिघांच्याही जिवावरचा दाब कमी झाला. लक्षकने तिचा हातातला तो कागद घेतला आणि मोठ्याने वाचायला सुरुवात केली.

"My Wishlist Before I die "

# ७

त्या कागदावरचे ते टायटल वाचूनच लक्षकचे हात थरथरायला लागले. आरव आणि नेत्रा दोघेही बुचकळ्यात पडले.

"अनघा बेटा... हा काय वेडेपणा आहे?? तू जगणार आहेस गं." नेत्राने तिची समजूत घालायचा प्रयत्न केला.

"हो, पण जगण्याची शक्यता नाकारता येत नाही तशी स्वीकारता पण येत नाही ना मम्मी. जर जगली तर अजून जगून आनंद घेईल, पण जर इतकंच आयुष्य असेल...तर मला इतकं तरी जगू दे " अनघाने आपला निर्णय सुनावला.

आरव आणि लक्षक दोघांनाही संमती देण्याशिवाय पर्याय नव्हता. पण त्या विशलिस्ट मध्ये अनघाने काय काय लिहिलं आहे याचा थांगपत्ता कोणालाच नव्हता. रात्र झाली... लक्षकने अनघाची विशलिस्ट पाहण्यासाठी मागितली. त्यात ज्या गोष्टी होत्या त्या खरंच खूप विचित्र आणि भरपूर साहस असणाऱ्या होत्या आणि त्याने त्याच रात्री अनघाला वचन दिले. तो तिची

विशलिस्ट पूर्ण करणार, पण त्या बदल्यात अनघाने आपली सगळी हिम्मत बरे होण्यासाठी आणि थेरेपीसाठी द्यावी असा लक्षकने तिच्याकडे आग्रह केला. आरव आणि नेत्रा परमिशन देतील का अनघाची विशलिस्ट पूर्ण करायला, याची एकच धास्ती त्याला लागून राहिली होती. पण अनघाच्या विशलिस्ट मुळे काहीवेळ का असेना... लक्षक कॅन्सरच्या धक्क्यातून बाहेर आला होता. उद्यापासून तयारीला लागायचे आहे, असा विचार करत करतच त्याचा डोळा लागला.

सकाळ झाली, ठरल्याप्रमाणे अनघा बरी होण्यासाठी सगळ्या सूचना फॉलो करणार होती. मग लक्षक स्वतः तिला डॉक्टर कडे घेऊन गेला... डॉक्टरने थेरेपी आणि बाकी सगळी औषधे आणि त्याव्यतिरिक्त इतर गोष्टी नीट समजावून सांगितल्या. घरी आल्यावर नेत्राने अनघासाठी साधेच पण रुचकर जेवण बनविले होते. जेवण जेवून तिला आराम करण्यासाठी आरव बेडरूम मध्ये घेऊन गेला आणि तिला गोंजारून त्याने झोपवले, आज पुन्हा यामध्ये त्याला अनघाचे बालपण आठवले... पण तेवढ्यात त्या सुखद अनुभवानंतर अनघाला कॅन्सर झाल्याचा धक्का त्याला परत जाणवला.

डोळ्यांत पाणी आले आणि तो अनघाला रूममध्ये झोपवून हॉल मध्ये आला. इथे लक्षक आणि नेत्रा दोघेंसुद्धा त्याची येण्याची वाट बघत होते. लक्षकने विषयाला हात घातला.

"डॅड, मला वाटते आपण अनघाची विशलिस्ट कम्प्लिट करायला हवी ना? " लक्षकने आरवला विचारले.

"अरे, तू वेडा झाला आहेस कि काय?? शुद्धीत ये जरा... काहीही बरळू नकोस. ती जगणार आहे... " रागाच्या भरात आरवने लक्षकसोबत आवाज उठवून बोलल्याचे नेत्राला जाणवले.

मग नेत्राने आरवची बाजू सांभाळून लक्षकला समजावले...

"लक्षक, hope for best... सगळं ठीक होईल रे... तिच्या विशलिस्टपेक्षा तिला बरं करण्यावर लक्ष देऊया ना आपण? "

"मम्मी मला मान्य आहे हे सुद्धा, पण जर तिची विशलिस्ट कम्प्लिट करायला आपण नकार दिला तर ती ट्रीटमेंटसाठी तयार होणार नाही...आणि औषधांचा सुद्धा तिच्यावर काही परिणाम होणार नाही. मी आज डॉक्टरांशी बोललो, त्यांनी

सांगितलं जेवढी ती आनंदी राहून ट्रीटमेंट घेईल, तेवढे तिचे जगायचे चान्सेस वाढणार. मग आपण तिची विशलिस्ट कम्प्लिट करायला घेऊ...तशी ती हॅप्पी होणार ना..." लक्षकने सगळं सांगून महत्वाचा मुद्दा दोघांच्याही ध्यानात आणून दिला.

"हो-नाही" करून दोघांनी अखेर संमती दिलीच. लक्षकच्या जीवावरून थोडासा भार कमी झाला. पण अनघाच्या विशलिस्टसाठी तिला आणि लक्षकला घराबाहेर जाणं महत्वाचं होतं, तेही कुलु-मनाली ला... कारण तिच्या विशलिस्ट मध्ये स्नो मॅन असतो ना तो बनवायचा होता आणि तोही त्या कुलू-मनालीच्या बर्फातच. मग संध्याकाळी आरव आणि नेत्राशी लक्षक बोलत होता... आरव पुन्हा त्याच्यावर चिडला आणि यावेळी नेत्रा सुद्धा लक्षकला रागे भरली. पण जेव्हा अनघा हॉल मध्ये आली तेव्हा सगळेच शांत झाले. तिने त्यांचे बोलणे येताना ऐकले असावे.

"डॅड, प्लिज जाऊ द्या ना मनाली ला... माझी लहानपणापासूनची इच्छा आहे. पक्का प्रॉमिस डॅड, टाइम टु टाइम औषधे घेईल मी. आणि लक्षक पण आहे ना माझ्या सोबत. प्लिज डॅड, मम्मी सांगा ना... मला जायचे आहे."

अनघाने असे बोलून घाव जिव्हारीच बसविले. तिच्या आग्रहाखातर आरव आणि नेत्राने होकार दिला. सकाळी जाऊन उद्या डॉक्टरांचा सल्ला आणि औषधे घ्यावी, आणि पटापट फ्लाईटची तिकीट बुक करायची होती. आजची रात्र अनघाने आरव आणि नेत्रा सोबत घालवायची ठरविले होते. लक्षक या रात्रीत त्याचे ऑफिसचे काम आणि पॅकिंग, बुकिंग सगळ्या गोष्टी आटपून घेणार होता. रात्री अनघाला नेत्राने छोट्या मुलीसारखी गोड अंगाई गाऊन निजविले. आणि चिंतेतच आरव आणि नेत्राचा डोळा लागला. सकाळी उठून सगळं आवरून अनघाने विश्रांती घेतली. दुपारची ३ वाजता फ्लाईट होती, त्यामुळे नेत्रा जेवण्याच्या तयारीला लागली. आज तिने अनघाची आवडती पुरणपोळी आणि लोणचं याचा बेत आखला होता. तिघांचं सुद्धा अगोदरच ठरलं होतं, कितीही काहीही झालं तरी अनघाला आपल्या टेन्शनचा थांगपत्ता लागू द्यायचा नाही, तिला आनंदाने बाय बोलायचं. अखेर सगळ्यांची जेवणं आटोपली आणि अनघा लक्षक तयार होऊन निघाले. तिने डॅड आणि नेत्राला मिठी मारली. अश्रू अनावर झालेच... त्यामुळे लक्षक तिला सावरून घ्यायला पुढे झाला. नेत्रा आणि आरव दोघेही त्यांना एअरपोर्टवर सोडायला येणार

होतेच, पण आधीच त्यांनी सांगितले नाही, नाहीतर अनघाने त्यांना "नका येऊ तुम्ही आराम करा" असे फर्मान सोडले असते. मग सगळे एअरपोर्टसाठी रवाना झाले, नंतर चेकिंग वगैरे होऊन फ्लाईटची वेळ झाली, टाटा-बायबाय करून अनघा लक्षक सोबत कुल्लू मनालीसाठी निघाली. इथे नेत्रा आणि आरव त्या दोघांना निरोप देऊन घरी परतले. आरव अजूनही अनघाच्याच चिंतेत होता, नेत्राच्या स्पर्शाने त्याला भानावर आणले. लक्षक तिची व्यवस्थित काळजी घेईल असे आश्वासन नेत्राने आरवला दिले. ४-५ तासांत अनघा आणि लक्षक दोघेही थंड अश्या कुलू-मनालीला पोहचले, घरी फोन करून कळवले आणि मग लक्षकने ऑन लाईन बुक केलेल्या हॉटेल मध्ये त्यांनी आपला तळ ठोकला. तसं बघायला गेलं तर लग्नानंतर आता त्यांना हवा तसा एकांत मिळाला होता. पण लक्षकला अनघाची सर्वोतोपरी काळजी घ्यायची होती. त्याने आठवणीने तिला औषधे दिली. नंतर नाश्ताची ऑर्डर देऊन तो फ्रेश होण्यासाठी निघून गेला. १५ मिनिटात नाश्ता आला. दोघेही नाश्ता खायला बसले. अनघा पहिला घास तोंडात घालणार तेवढ्यात लक्षकने तिला अडवले.

"अनघा तुझी हरकत नसेल तर पुढचे सगळे दिवस मला तुला माझ्या हाताने भरवायचे आहे." लक्षकने अनघाला समोरून विचारले.

अनघा लाजेने चुर झाली आणि तिने मानेनेच होकार दिला. लक्षकने तिला पहिला घास भरविला आणि हळूहळू त्यांच्यात प्रेमाच्या फुटलेल्या अंकुराला पालवी बहरून येत होती. नाश्ता उरकून झाल्यावर दोघांनी आजच्या दिवस विश्रांती घ्यायची ठरविली. मग रात्र झाली तशी त्याला अनघाच्या विशलिस्ट मधली एक इच्छा आता पूर्ण होऊ शकते, हे डोक्यात आले. त्याने पटकन एक चॉकलेट आईसक्रीमचा डबा ऑर्डर केला आणि अनघाला झोपेतून उठवून..." सरप्राईज " असे मोठ्याने ओरडला. अनघा उठून बघते तर काय... इतका मोठा चॉकलेट आईसक्रीमचा डब्बा... तिच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून लक्षकच्या मनातील आनंद गगनात मावत नव्हता. कारण अनघाच्या विशलिस्ट मध्ये चॉकलेट आईसक्रीमचा पूर्ण १ लिटरचा पॅक खायचा ही विश होती. मग अगोदर सारखं लक्षकने अनघाला पहिला चॉकलेट आईसक्रिमचा चमचा भरविला. तसं अनघाला एकटीलाच संपूर्ण खायचं होतं, पण

कळत नकळत तिच्या मनात लक्षक विषयीचा आदर आणि प्रेम वाढलं होतं. म्हणून त्याला एक चमचा भरविण्याचे ठरविले, तो चमचा त्याच्या तोंडाकडे नेला खरा... पण काय बुद्धी सुचली कोणास ठाऊक... चमचा राहिला बाजूला आणि त्याच्या नाकावर तिने जोकर सारखं आईसक्रीम लावलं आणि एखाद्या लहान मुलीसारखी खुदुखुदू हसू लागली. पहिल्यांदा लक्षकला काय झाले, ते कळलेच नाही ......पण जेव्हा त्याने आरश्यात डोकावून पाहिले तेव्हा कळले आणि तोही स्वतःवर हसू लागला. मग अनघाला आईसक्रीम लावण्यासाठी तो तिच्या पाठी लागला. तो कोच, टेबल, गॅलरी सगळ्या ठिकाणी त्यांची पकडापकडी चालू झाली. आणि अखेर अनघा त्याच्या हातात सापडलीच. आईसक्रीम लावणं दूरच... पण तो तिच्या सौंदर्यात हरवून गेला...आणि पुन्हा तिच्या प्रेमात पडल्याचा त्याला आभास झाला. नकळतच तो तिच्या डोळ्यांत हरवून गेला. नंतर चुटकी वाजवून अनघाने त्याला भानावर आणले. खूप रात्र झाली होती, अनघा आणि तो बेडवर खूप साऱ्या गोष्टी करीत करीत झोपी गेले. अश्या प्रकारे त्यांचा मनालीचा पहिला दिवस मस्तच गेला.

आता सकाळी उठल्या उठल्या अनघाला वेध लागले होते स्नोमॅनचे. मग तिने पटापट आवरून लक्षकला उठविले आणि ब्रेकफास्ट करून ते कुल्लू मनालीच्या बर्फाळ डोंगरावर निघाले. तिथे पोहचताच... पहिल्यांदा अनघा इतक्या जवळून तो बर्फ बघत होती. मग स्नो मॅन बनवता बनवता ते दोघे खूप खेळले. बर्फ एकमेकांवर उडवणे आणि अजून काही. सगळं काही १-२ तासांत एन्जॉय केलं. मनालीला जवळ जवळ १-२ आठवडे झाले, त्यांच्यात खूप चांगली जवळीक निर्माण झाली होती. अनघाच्या विशलिस्ट मधल्या बऱ्याचश्या विश सुद्धा पूर्ण झाल्या होत्या. आता राहता राहिली ती एक विश... कॅंडल लाईट डिनर ते सुद्धा साधे सुधे नव्हे...तर बोटी मध्ये. पण ही विश मनाली मध्ये पूर्ण करू शकत नव्हते, म्हणून ते मनाली वरून मुंबईला परतले. इकडे कधी एकदा अनघा आणि लक्षकला बघतो असे आरव आणि नेत्राचे झाले होते. जशी घरासमोर गाडी थांबली, अनघा धावत येऊन आरव आणि नेत्राला बिलगली.

दोन चार दिवस आराम केल्यावर लक्षकने अनघाची शेवटची विश पूर्ण करायचा प्लॅन बनवला. खास तिच्यासाठी

नेत्रा सोबत जाऊन रेड गाऊन घेऊन आला... आणि एका शिप मध्ये कॅंडल लाईट डिनरचा प्लॅन केला होता. संध्याकाळी तयार झाल्यावर त्याने अनघाला गाडीत बसवून निघाला. वाटेत अनघाने त्याला किती सारे प्रश्न विचारले ....पण लक्षक तो. असा कसा सगळं सरप्राईज सांगणार .... मग शेवटी पोहचायच्या १० मिनट अगोदर अनघाच्या डोळयावर एक पट्टी बांधली.

आधी अनघाने हो-नाही केले, पण नंतर फक्त लक्षकच्या प्रेमाखातिर तिने हे मान्य केले. मग गाडीतून उतरून, लक्षकच्या मदतीने अनघाला बोटी मध्ये घेऊन आला. शेवटी सरप्राईज बोलून त्याने तिच्या डोळयावरची पट्टी खोलली. समोर ती बोट, डेकोरेट केलेले टेबल, कॅंडल, गुलाबाची फुले, लायटिंग... सगळं बघून अनघा खरंच खूप सरप्राईज झाली होती. तिने लक्षकला आनंदाच्या भरात एक घट्ट मिठी मारली.

"ओ मॅडम, अभी तो पिक्चर बाकी है, ये तो सिर्फ ट्रेलर था." असं म्हणत त्याने तिला खुर्ची ऑफर केली. दोघेही एकमेंकांत हरवून गेले होते. नंतर लक्षकने आवडीचे गाणे लावून अनघासोबत डान्स केला आणि सगळयांत शेवटी, अनघासमोर

गुडघ्यावर बसून तिला पुन्हा प्रपोज करून तिच्या हातात डायमंड रिंग घालून तिच्या हातांचा गोड मुका घेतला. आणि ती रात्र त्या दोघांसाठी खरंच खूप रमणीय ठरली.

पुढचे सगळे दिवस अनघाच्या हॉस्पिटलमधल्या फेऱ्या वाढत होत्या. तिच्या टेस्ट, थेरेपी आणि बाकी सगळ्या गोष्टीसाठी अनघा सोबत सगळ्यांची धांदल उडाली होती. पण एके दिवशी सकाळी अनघा उठली आणि तिने लक्षकला उठवले आणि अनघाने लक्षकला काहीतरी सांगितले. दोघेही खूप खुश झाले …… पण लक्षकला अनघाची भीती वाटत होती, पण अनघाच्या आग्रहाखातर लक्षकने आरव आणि नेत्राशी बोलायचे ठरविले.

"डॅड, मम्मी अनघा माझ्या मुलाची आई होणार आहे." लक्षकने दोघांना सांगितले.

"अरे लक्षक, तुला कळतेय का तू काय बोलतोय... हे शक्य जरी असले तरी तिची हालत किती नाजूक आहे, हे तुला समजतंय ना..." नेत्राने आपले म्हणणे आणि अनघाच्या जीवाला असणारा धोका लक्षात आणून दिला.

"तरी सुद्धा मम्मी, आम्हाला आमचा बेबी अबोर्ट करायचा नाहीए... आम्ही त्याला वाढवणार." लक्षकने नेत्राला आपला निर्णय ऐकवला. नेत्राच्या राग अनावर झाला, तिने लक्षकवर हात उचलला.

"तुला कळत कसं नाही, आताच्या घडीला काय जास्त महत्वाचं आहे ते...हट्ट करू नकोस उगीच. अनघाच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे हा. तिच्या जीवाशी खेळण्याचा हक्क तुला सर्वस्वी दिला नाहीये कोणी." नेत्रा लक्षकला बडबडू लागली.

आरव अजूनही सुन्न होता. शेवटी त्याने बोलायला चालू केले. "नेत्रा तू उगाच लक्षकला फक्त कारणीभूत ठरवू नकोस. मी अनघाला लहानपणापासून ओळखतो, बहुधा तिनेच लक्षकला हा बेबी ठेवण्यासाठी गळ घातली असेल, आणि त्यामुळे लक्षक तिच्या बोलण्यात येऊन काही दुसरा विचार न करता फक्त बेबीचा विचार करत आहे."

हे ऐकून अनघा सहित लक्षक आणि नेत्रा सगळेच शॉक झाले. शेवटी अनघा आरव जवळ जाऊन बसली. त्याचा हात हातात घेऊन त्याला म्हणाली, " डॅड, मे बी मी काही महिन्यांची नाहीतर वर्षांची सोबती आहे, पण आमचं येणारं बाळ हे

आमच्या प्रेमाचं प्रतिक असेल, आणि नक्कीच ते तुम्हां दोघांना आणि लक्षकला सुद्धा माझी कमी खळू देणार नाही. मी माझी सगळी काळजी घेईल, लक्षक सुद्धा माझी आणि होणाऱ्या बाळाची काळजी घेईल, प्लिज मला आमच्या दोघांच्या प्रेमाच्या रोपांचे फुल फुलण्याआधी कोमेजून जावे, असे मुळीच वाटत नाही. माझी सगळी विशलिस्ट तुम्ही पूर्ण केलीत, मग ही माझी शेवटची इच्छा म्हणून तरी हो बोला ना..." अगदी काकुळतीला येऊन अनघाने आरव आणि नेत्राला समजावले. पुन्हा फक्त अनघाच्या आनंदाखातिर "होकार" देण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यांच्या संमतीमुळे अनघा आणि लक्षक दोघेही खुश झाले. मग रोज अनघा आरव सोबत सकाळी वॉकला जायची, आणि संध्याकाळी नेत्रा सोबत. अनघाची कॅन्सर ट्रीटमेंट सुद्धा चालू होती. अनघाला डोहाळे सुद्धा लागले होतेच. चॉकलेट काय, आईसक्रीम, चिंच - कैरी, चटपटीत पाणीपुरी... सगळे पुरवायला लक्षक एक पायावर तयारच असायचा नेहमी.

बघता बघता ७ महिने उलटले. अनघाची ओटी भरली, सगळ्या आजूबाजूच्या बायका तिला बाळंतविडा घेऊन

आल्या. सगळं काही ठीक चाललं होतं. अश्यातच नऊ महिने भरत आले आणि एके दिवशी अनघा नेत्रासोबत वॉकला गेली असताना संध्याकाळी तिला पोटात दुखून आले, नेत्राला समजून चुकले, वेळ जवळ आली असल्याचे... तिने पटापट लक्षकला फोन लावला आणि तडक बागेत बोलावून घेतले. आरवला फोन करून हॉस्पिटल मध्ये बोलावले. सगळे वेळेवर पोहचले आणि अनघाला मध्ये घेण्यात आलं, लक्षकही अनघाच्या सोबतीला होता. इथे नेत्रा आणि आरव दोघेही देवाकडे हात जोडत होते. आरवला निशाच्या वेळी जे झालं होतं, ते अनघाच्या वेळी नको होतं आणि नेत्राला अनघा आपल्या मुलीसारखी होती, म्हणून ते दोघेही देवाला डिलिव्हरी सुखरूप व्हावी म्हणून विनवीत होते. अखेर अनघाची डिलिव्हरी झाली. मुलगा झाला होता. बाळ आणि अनघा दोघेही सुखरुप होते, नर्सने बाहेर येऊन आरव आणि नेत्राला ही गोड बातमी दिली. नेत्रा आणि आरवला कोण आनंद झाला, तिला अनघाला आणि त्या बाळाला कुठे ठेवू अन कुठे नको असे झाले होते. मग १-२ दिवसांनी तिला डिस्चार्ज दिल्यावर घरी आणले. नेत्राने आरती करून अनघा आणि बाळावरून भाकरीचा तुकडा ओलांडून नजर काढली. अनघाला आता

मध्ये मध्ये जास्त त्रास जाणवत होता, तिला कळून चुकलं होतं आपला वेळ जवळ आला आहे ते, पण घरात बाळ आल्यापासून आनंद होता. तिला त्या आनंदाला विरजण लावायचं नव्हतं, म्हणून तिने सगळ्यांशी या विषयावर बोलणे टाळले होते. बाळ ३ महिन्याचे व्हायला आले. नाक, डोळे अगदी अनघासारखे आणि रंग सुद्धा गोरा गोमटा. तोंडावरून थोडा फार लक्षकवर गेला होता, पण यातही अनघाचं वरचढ ठरली होती. आता आरव आणि नेत्रा दोघांचाही वेळ बाळाला खेळवण्यात जात होता. बाळाला बघ, हे कर - ते कर, त्याच्या नॅपी बदला, त्याला कडेवर घ्या सगळं काही करण्यात आरव आणि नेत्रा दोघेही सुख मानीत होते. एके दिवशी अनघाने नेत्राला बोलावून घेतले...

"मम्मी मी नसेल तरी याला आई सारखं सांभाळा आणि माझ्यावरचं जसं आईचं छत उडून गेलं होतं तसं याचं पण होईल, पण याला आधार द्या." अनघा इतके बोलून नेत्राच्या कुशीत शिरली आणि हुंदके देऊ लागली. नेत्राचे डोळे भरून आले.

"अगं वेडाबाई, अशी काय बोलतेय, तू कुठे जाणार नाहीस समजलं?? आपलं बाळ आलं, देवानं तुला आई होण्याचं सुख दिलं, मग आता तो सगळं चांगलंच करणार आहे. वाईट विचार मनात आणू नकोस. समजलं? सगळं काही ठीक होईल." नेत्राने तिला घट्ट आलिंगन देऊन याची शाश्वती दिली.

आता बाळाचे बारसे करायचे... मग नाव काय ठेवावे... खूप सारी नावे पालथी घातली, पण एक ना धड आवडे कोणाला. एकाला आवडले तर दुसऱ्याला नाही आणि ह्याला आवडले तर हिला नाही, असे होत होते. एके दिवशी अनघा तिची डायरी घेऊन बसली होती. सहज म्हणून तिने एका कागदावर "अनघा " "लक्षक" अशी दोन नावे लिहिली आणि बराच वेळ त्या नावांकडे बघत राहिली. तेव्हा तिला जाणवले, दोघांच्या नावाला जोडून एक नाव तयार होतेय... मग आपण हेच नाव ठेवायला हवं ना...

रात्री जेवताना तिने सगळ्यांना तिची आयडिया सांगितली.

" हे बाळ आमच्या दोघांची निशाणी आहे ना... आणि आमचा अंश सुद्धा..मग याचं नाव आपण "नक्ष" ठेवूया का??" अनघाने सांगितले तेव्हा सगळयांच्या चर्येवर आनंद होता.

आरव, लक्षक, नेत्रा तिघांनाही नाव खूप आवडले आणि ती कल्पना सुद्धा (अनघा + लक्षक = नक्ष). लक्षक अनघाच्या या आयडियावर खूपच खुश झाला होता. लवकरच बाळाचे बारसे केले आणि त्याचे नाव "नक्ष" ठेवण्यात आले. बाळाच्या आनंदात अनघा आपल्या तब्बेतीवर लक्ष देत नव्हती. लक्षक नेहमी तिला बोलायचा... पण ती टाळत होती, तिला कळून आले असावे बहुधा.. एक नि एक दिवस आता जायचे आहे तिला. आणि जवळपास १ आठवड्यानंतर अनघाला खूप रक्ताच्या उलट्या झाल्या आणि पांढऱ्या पेशींची वाढ जास्त होत गेली. त्यामुळे तातडीने अनघाला हॉस्पिटल मध्ये भरती करण्यात आले. तिने चुकविलेल्या प्रत्येक औषधांच्या डोसामुळे तिला या आजाराशी लढणे खूप कठीण होत गेले. पण लक्षक अजूनही अनघाच्या दीर्घायुष्यासाठी देवाकडे विनवणी करीत होता. आरवने त्याला देवाकडे भरल्या डोळयांनी हात पसरवून अनघाचे आयुष्य मागताना पाहिले,

त्याच्याही डोळयात पाणी तरळले. निशाच्या वेळी आरवचा कासावीस झालेला दिवस त्याला आठवला. पण देवानं निशाच्या वेळी सुद्धा आरवची निराशाच केली होती, आता अनघाच्या वेळी काय होणार हे त्या देवालाच ठाव. त्याने हळूच लक्षकच्या पाठीवर हात ठेवला, लक्षकला त्याला पाहून विवेकाचा बांध सुटला आणि लक्षकने आरवला मिठी मारून रडायला सुरुवात केली. आरवने लक्षककडे पाहिले, त्याला आठवले वीसेक वर्षांपूर्वी मी लक्षकच्या जागी होतो, मला सावरायला कोणी तरी हवं होतं. आज लक्षकला खऱ्या अर्थानं माझी गरज आहे.

"लक्षक, रडू नकोस, धीर खचू नकोस. हा देव आपल्या पाठीशी आहे. तो नक्कीच आपल्या अनघाला सुखरूप ठेवेल." आरवने लक्षकला सहानुभूतीने समजावले आणि त्याच्यासोबत अनघासाठी देवाकडे जीवनदान मागू लागला.

तेवढ्यात ऑपरेशन रूम मधून नर्स बाहेर आली आणि तिने "मिस्टर साने" अशी हाक मारली. त्या आवाजाने आरव आणि लक्षक दोघे सुद्धा धावत आले.

"पेशन्टला तुमच्याशी काही बोलायचे आहे." नर्सने निरोप दिला.

अगदी घाईने लक्षक आणि आरव दोघे सुद्धा अनघाच्या रूम मध्ये आले. अनघा कॉट वर पडली होती. तिच्यात उठायचे सुद्धा त्राण नव्हते. औषधे आणि गोळया यांच्यामुळे पार सुकून गेली होती. लक्षक तिच्या जवळ आला आणि त्यानं तिचा हात हातात घेतला.

"मिसेस साने, काही होणार नाही तुला, आणि मला सोडून तू कुठेही जाणार नाही. समजलं? " आपल्या डोळयांतले अश्रू अनावर झाले असताना सुद्धा ते आवरत त्याने अनघाला धीर द्यायचा प्रयत्न केला.

पण परिणाम व्हायचा तो झालाच नाही. अनघाने बोलायला तोंड उघडले, पण बोलायला जमत नव्हते. ती फक्त तोंडातल्या तोंडात पुटपुटत आहे, असाच बोध होत होता. तिने अतिशय मोठ्या कष्टाने एकदाचे बोलणे सुरु केले.

"लक्षक, मी नसताना तू माझ्या डॅडना, नेत्रा मम्मी आणि आपल्या नक्षला सांभाळ. स्वतःच्या जीवाशी खेळू नकोस. मी

माझी सगळी जबाबदारी तुझ्यावर सोडून जातेय. घरात कोणालाही माझी कमी खळू देऊ नकोस."

इतकं बोलून अनघाचा लक्षकच्या हातातला हात थंड पडला.

लक्षकला उमजून आलेच, आता काहीच होऊ शकत नाही. त्याने "अनघा ssssssss " अशी मोठ्याने हाक दिली, कारण याच्याशिवाय तो काही करू शकत नव्हता.

# ८

लक्षकला झालेले विरहाचे दुःख आणि त्याचे सांत्वन करायला अनघा त्याच्याकडे नव्हती. अनघा जीवनाच्या वाटेवर लक्षकला एकटे सोडून देवाघरी गेली होती. लक्षकला स्वतःला सावरणे मुश्किल झाले होते. अनघाच्या निष्काळजीपणामुळे तिची कॅन्सर या आजाराशी ती झुंज अखेर अपयशी ठरली. पण पूर्ण आयुष्याच्या इच्छा पुऱ्या करून ती कॅन्सरला शरण गेली होती आणि अनघाच्या जीवनात "नक्ष" मुळे आलेलं मातृत्व जणू काय देवानं तिला दिलेला बोनस होता. त्यामुळे तिने हसऱ्या मुद्रेने मृत्यूला कवटाळलं होतं. तिला सगळं कळून आलं होतंच... कारण ती नेत्रा आणि आरवला नक्षचा सांभाळ करण्यासाठी अगोदरच वचनबद्ध करून गेली होती. तिच्या मृत्यूमुळे लक्षक स्वतःला आवरू शकला नाही. तो दुःखात पूर्णपणे बुडून गेला. नेत्रा वेळोवेळी लक्षकची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत असे, पण उपयोग शून्य. त्याच्या अन अनघाच्या विरहाचे घाव त्याच्या जीवावर अजून तसेच जिवंत होते. त्याला ते टोचत होते, जिव्हारी लागत होते.

पण अनघासोबत घालविलेला एक नी एक क्षण त्याला त्याच्या दुःखातून सावरायला मदत करत होता. आरवला या सगळ्याची जाणीव होती. आपल्या जोडीदाराला गमावल्याचे दुःख त्याने सुद्धा अनुभवले होते. म्हणून तो लक्षकला काही बोलत नव्हता. अनघाला जाऊन आता ६ महिने उलटले होते. हळूहळू लक्षक सुद्धा अनघाच्या जाण्याने त्याच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी "नक्ष" सोबत भरून काढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. एके दिवशी बेड वर पहुडला असताना त्याच्या डोक्यात काहीतरी नवीन सुचले. त्याने ती कल्पना त्याच्या मम्मी आणि आरव सोबत शेअर केली. त्या दोघांनीही मोठ्या मनाने त्याला प्रोत्साहन दिले आणि लवकरच त्याने ती आयडिया अंमलात आणायची असे ठरवून तो कामाला लागला. बरोबर १ महिना आणि ३ दिवसाच्या अंतराने अनघाचा बर्थडे होता. साजरा करायला ती या जगात नव्हती, पण लक्षकने सुचविलेल्या कामासाठी तिचा बर्थडे हाच खरा शुभदिन होता. त्यामुळे लक्षक जोरदारपणे कामाला लागला.

आता लक्षक बऱ्यापैकी सावरला होता. कारण येणाऱ्या २० तारखेला अनघाचा बर्थडे होता आणि तो जे काही करत होता त्यामुळे थोडं का असेना अनघाच्या आठवणींत हरवून स्वतः "अनघामय" झाला आहे, असे वाटून आनंदी व्हायचा. हळूहळू त्याने तयारीचा वेग वाढविला. आता तो दिवस अगदी २ दिवसांवर येऊन ठेपला होता. बुकिंग झाली, कन्टेन्ट तयार होताच. वेळ ठरली संध्याकाळची. २ दिवस भुर्रकन उडून गेले आणि ज्या दिवसाची लक्षक सोबत नेत्रा आणि आरव आतुरतेने वाट पाहत होते, तो दिवस येऊन ठेपला. सकाळी अनघाच्या फोटोला आरती करून दिवसाची सुरवात केली आणि नेत्राने तर चक्क पुरणपोळी आणि लोणचं याचा बेत आखला होता दुपारच्या जेवणासाठी. हो, अनघाची आवडती डिश होती ना ती. पटापट तयार होऊन सगळे हॉलवर पोहचले. जिथे लक्षकने अगोदरपासूनच हजेरी लावली होती. शो सुरु व्हायची वेळ झाली. पहिल्याच वेळी खूप प्रतिसाद होता, हॉल अक्षरशः गजबजून गेला होता. आणि तेवढ्यात लक्षकने स्टेजवर एन्ट्री घेतली.

"हॅलो एव्हरीवन, गुड इव्हनिंग... मी लक्षक साने. चला तर सूरु करूया आजच्या शो ला." असे म्हणून त्याने सुरुवात केली.

"माझी पहिली कविता माझ्या प्रेमासाठी समर्पित लेट मिसेस अनघा साने. अनघा आज तू या जगात नाही, तरी आमच्या मनात जिवंत आहेस. तू कोठेही असेल तिथे सुखरूप राहा. आजच्याच नव्हे तर येणाऱ्या प्रत्येक आगामी शोची सुरुवात फक्त तुझ्याच नावाने होईल, अनघा...." इतके बोलून लक्षकला गहिवरून आले. त्याने स्वतःला सावरत आपली नजर प्रेक्षकांवरून फिरवली. त्याला आभास होत होता. त्या प्रेक्षकांमध्ये त्याची अनघा सुद्धा होतीच. त्याने डोळे बंद करून तिला मनोमन आठवले आणि त्याच्या कवितेला सुरुवात केली.

***गंध तू, जीवनाचा सुवासिक सुगंध तू...***
***पाहता एक नजरेत तुज, झालो मी बेभान बेधुंद***
***कळलेच नाही कसा झालो मी तुझा...***
***एका नजरेनेच मांडीला हा खेळ अनोखा..***

***विरघळून तुझ्यात मी.. हरविले स्वत:ला***
***गमावुनी स्वत:शी, गवसिलें तुजला ।***

***तुझ्या मोहक हास्याने छेडल्या***
***त्या तारा माझ्या हृदयाच्या***
***मन जुळली दोघांची...***
***गाठीत बांधलो जन्मांतरीच्या***
***नसावा तो दुरावा नात्यातला तुझ्या माझ्या***
***नेहमीच राहावी तू माझी अन मी तुझा ।***

आणि त्याने आपली कविता सादर केल्यानंतर टाळ्यांचा कडकडाट झाला, प्रेक्षकांनी आपला प्रतिसाद देत त्याला पुढच्या शायरीकडे जाण्याचा इशाराच दिला. त्यानंतर लक्षकने बऱ्याच साऱ्या त्याच्या कविता, शायरी यांचे वाचन केले. प्रेक्षक मध्येच भावूक होत, कधी खुलून हसत अशातच शोचा शेवट करायला लक्षक पुढे आला.

" सुरुवात अनघापासून केली, पण मी यशस्वी होण्यासाठी अजून एका व्यक्तीचे आभार मानायचे आहे. ती म्हणजे माझी आई. मिस नेत्रा साने. तिच्यामुळे मी घडलो आणि जो काही आहे तो फक्त तिच्यामुळेच. " पुन्हा लक्षकला गहिवरून आले. पण, नेत्राच्या डोळ्यातली ती चमक आणि अभिमान बघून त्याने स्वतःला सावरले. आणि पुढे बोलू लागला.

" मेरे माँ को गिनती नही आती...

शायद दुनिया की किसी भी माँ को गिनती नही आती।"

इतकं बोलल्यावर नेत्रासमवेत इतर प्रेक्षकांमध्ये सुद्धा कुजबुज सुरु झाली. लक्षकला या सर्व गोष्टींची अगोदरच कल्पना होती. म्हणून त्याने धीर धरून तो सस्पेन्स वाढवायचे ठरवले.

**"हाँ, तो मैंने बोला...**

***मेरे माँ को गिनती नही आती...***

***शायद दुनिया की किसी भी माँ को***

***गिनती नही आती।***

***क्योंकि जब भी मैं उसे बोलू***

*मुझे २ रोटी देना,*

*वो हमेशा ४ला देती है...*

*और अगर कोई माँ दो बोलकर*

*दो रोटी ला देती है*

*तो कसम इस महफ़िल की..*

*आप गोद लिए हुए है।"*

प्रेक्षक अजूनही धक्क्यात होते. पण या शेवटच्या शायरीनंतर प्रेक्षक खुर्चीवर बसून नव्हते, तर पूर्ण हॉल मधले प्रेक्षक उभे राहून लक्षकला टाळ्यांसोबत खूप सारे आशीर्वाद देत होते. कारण शेवटच्या शायरीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविले होते. यावेळी २-४ मिनिटे वेळ लक्षकने प्रेक्षकांना सावरायला दिला आणि नंतर माईकचा ताबा घेतला आणि बोलायला सुरुवात केली.

"आजपासून जे काही करण्याची सुरुवात करतोय त्यासाठी मला तुम्हां सगळ्यांच्या पाठिंब्याची गरज आहे. मी आजपासून आयोजित केलेल्या प्रत्येक कॉन्सर्टमधून मिळालेले पैसे ब्लड कॅन्सर फंडसाठी डोनेट करणार आहे. खरे तर ह्या

सगळ्यासाठीचे श्रेय हे फक्त आणि फक्त माझ्या वाईफला म्हणजे लेट मिसेस अनघा साने हिला जाते. आज ती या जगात नाही पण माझ्या हृदयात आहे आणि तिच्या प्रेमाखातिर मला माझ्याकडून काहीतरी अविरत करावं, अशी भावना दाटून आली. म्हणून मी हा निर्णय घेतला आहे. " एवढे बोलून लक्षकने शो संपला असे जाहीर केले.

इथे प्रेक्षकांसोबत नेत्रा-आरव दोघांनाही लक्षकने घेतलेल्या निर्णयाचा खूप गर्व वाटत होता. प्रेक्षकांनी पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट करून त्याच्या निर्णयाला संमती दर्शविली. अशा प्रकारे लक्षकने आयोजित केलेला त्याचा पहिला शो अपेक्षेपेक्षा सुंदररीत्या पार पडला. त्यानंतर लक्षकने बरेच सारे शो केले. प्रेक्षकांकडून त्याला भरघोस प्रतिसाद वेळोवेळी मिळत होता. तशातच २-३ दिवसानंतर त्याचा २५ वा शो होता. कारणही खास होतं. नाही नाही म्हणता, त्याने २५ शोचे ध्येय केव्हा गाठलं ते कळलंच नाही. त्याने यासाठी जिथे पहिला शो केला होता, तिथेच हा शो ठेवण्याचे ठरविले. याच महिन्यात त्याच्या अन अनघाच्या लग्नाचा वाढदिवस होता. अनघा नव्हती समोर, पण हृदयात आजही त्याच्या तिची ती

जिवंत प्रतिमा साकारलेली होती. तयारी जय्यत सुरु होती. आणि त्याच दिवशी त्याने शो ठेवण्याचा निर्णय घेतला होता. विशेष म्हणजे प्रेक्षकांनी दिलेल्या अमाप सहकार्यामुळे त्याने हा शो विनातिकीट (फ्री एन्ट्री) ठेवला होता. दिवस जवळ येत होते.

शेवटी शोचा दिवस येऊन ठेपला. आज त्याने अनघाच्या आवडीचा रॉयल ब्लू ब्लेझर घातला होता आणि त्याला मॅचिंग म्हणून फिकट तपकिरी रंगाची पॅण्ट घातली होती. घरातून निघून शोच्या ठिकाणी पोहचायला तसा अवकाश होता. तरी आज त्याने मुद्दामहून जरा लवकरच स्वतःचे आवरून घेतले होते. क्षणभर डोळे मिटून त्याने दीर्घश्वास घेतला आणि नंतर त्याच्या टेबलाजवळ येऊन तिथे अनघाचा असलेला फोटो उचलून हृदयाशी धरला. बराच वेळ झाला, बहुधा तो त्याच्या अनघाशी थेट हृदयातून मूकसंवाद साधित होता. लागलीच त्याचे डोळे पाणावले. त्या रूम मध्ये कोणी नव्हते म्हणून आज त्याने त्याच्या डोळयांतील आसवांना वाट करून दिली. आज पुन्हा नव्याने त्याला अनघासोबत घालविलेले क्षण न क्षण आठवत होते. त्यांची फ्रेंडशीप, पाणीपुरी खाताना त्याची झालेली फजिती, समुद्र किनाऱ्यावर

वाळू मध्ये अनवाणी पायाने चालून उमटलेल्या त्या पाऊलखुणा... सगळं काही त्याच्या डोळ्यासमोर येत होतं. तेवढ्यात दारावर टकटक झाली आणि त्या आवाजाने त्याचे चित्त विचलित झाले. नेत्रा दाराजवळ उभी होती. तिला पाहताच त्याने आपले डोळे पुसून 'काही झालेच नाही' अशा आविर्भावात तिच्याकडे बघताना विचारले,

"काय झाले गं, चल नक्षला रेडी केलं ना? उशीर होईल, निघूया आपण आता. "

" हो, उशीर होईल म्हणूनच मी तुला आवाज द्यायला आले रे. चल निघूया." नेत्राला जाणवले होते म्हणून जास्त खोलात न जाता तिने त्याला उत्तर देत निघूया म्हणून विषय थांबवला. मग सगळे शोच्या स्थळी रवाना झाले.

या शोला सुद्धा बाकी शो सारखीच तुफान गर्दी होती. स्टेजवर लक्षक येऊन त्याने माईकचा ताबा घेतला आणि चक्क प्रेक्षकांकडून तुफानी टाळ्यांचा कडकडाट झाला. सोबत "लक्षक, लक्षक" असे आवाजही गर्दीतून ऐकू येत होते. आज लक्षकला अनघाची फारच आठवण येत होती. का कोण जाणे, पण आज त्याच्या डोळ्यांसमोरून अनघाचे चित्र हलतच

नव्हते. पण मग प्रेक्षकांच्या आवाजामुळे तो भानावर आला आणि त्याने शोला सुरुवात केली. २-४ शायरी आणि कवितांचा पाऊस झाल्यावर प्रेक्षकांनी "लक्षक, लक्षक " नावाचा अमाप गजर सुरु केला. या मिळालेल्या वेळात लक्षकने स्वतःला सावरले आणि पुढचे पाऊल घेतले.

"आज माझ्या आणि अनघाच्या लग्नाचा वाढदिवस. तसं बघायला गेलो ना तर खूप जगलोय आम्ही आमचे आयुष्य संगतीत एकमेकांच्या. सुख दुःखे वाटून पैलतीर गाठला आम्ही देवाच्या कृपेनं खरा. पण नियतीने खेळला डाव एक निराळा … राजाची राणी सोडून गेली त्याला एकट्याला." लक्षकने आपल्या शब्दांच्या जादूने प्रेक्षकांना अगदी खिळवून ठेवले. त्या सर्व जमलेल्या प्रेक्षकांना भानावर आणत, त्याने शो पुढे नेला. "असो, जे झाले ते आपल्या हाती नव्हते, जे झाले ते देवा मंजूर होते. मी आता तुमच्या समोर माझ्या अनघासाठी समर्पित केलेली एक छोटीशी चारोळी सादर करतो. आजवर तुम्ही जे मला प्रेम दिले, याचा मी आयुष्यभर ऋणी राहील. " असे बोलून लक्षकने त्याच्या कवितेला सुरुवात केली.

***प्रेम प्रेम असावं, ते असावं***

*पण दिसावं असं नसावं*

*ते फक्त जाणावं*

*आणि दिसामाजी वाढत जावं ।*

*प्रेमाच्या पाकळ्या सुगंधातून बहरून याव्या..*

*कधी मोगरा*

*तर कधी गुलाबाच्या असाव्या...*

*प्रेम प्रेम असावं,*

*सुगंध फुलांचा असावा...*

*परि कोमेजण्याचा त्यात गुणधर्म नसावा ।*

इतके बोलून लक्षकला त्याचे अश्रू अनावर झाले. तो प्रेक्षकांना पाठ करून उभा राहिला आणि डोळ्यातले पाणी टिपून घेतले. प्रेक्षक अजूनही भानावर आले नव्हते. कारण त्याच्या त्या चारोळीतून जो गर्भार्थ जाणवला होता, तो खूप थोर होता. शेवटी निरोपाची वेळ झाल्यावर दोन गोड शब्द बोलून त्याने प्रेक्षकांचा निरोप घेतला. नेत्रा-आरव आणि नक्षला गाडीत बसवून घरी पाठविले आणि तो आपली कार घेऊन रात्री

त्या बीचवर निघाला. चांदण्याच्या प्रकाशात त्याला त्याची अनघा जणू साथ देतेय, असा आभास होत होता. एकदाची तो त्या जागेवर येऊन पोहचला. तीच ती जागा, जिथे खुल्या निळ्याशार आभाळाखाली, चांदण्याच्या मंद प्रकाशात अनघा आणि लक्षकने खुल्या डोळ्यांनी एकत्रित भविष्याची स्वप्ने रेखाटली होती. आज त्याला सकाळपासूनच अनघाची फार आठवण येत होती.

त्या बीचवर बसल्यावर त्याने त्याच्या वॉलेट मधून अनघाचा पासपोर्ट साईज फोटो काढला. शर्टच्या खिश्यातून लाल गुलाब काढले आणि फोटो समोर धरून, तिला आठवू लागला.

"अनघा, पुन्हा हो म्हणशील का? माझ्या सोबत आयुष्य जगायला येशील का? " रडवेल्या सुरात तो अनघाला विचारीत होता.

"अनघा, बोल ना... पुन्हा माझी होशील का? " त्याच्या गालांवरून आसवे ओघळत होती.

नंतर बराच वेळ तो सळसळत्या लाटांमध्ये अनघा आणि त्याच्या बोलण्याची ती कुजबुज शोधीत होता. सहज वेळेकडे

कटाक्ष टाकला तर रात्रीचे ११:३० वाजले होते. मग त्या मोकळ्या हवेत दीर्घ श्वास घेऊन तो परतीच्या वाटेला लागला. गाडीत बसल्यावर त्याने गाणी सुरु केली. अनघाचा फोटो समोर होता, त्यापुढे त्याने ते अगोदरचे टवटवीत गुलाबाचे फुल ठेवले आणि त्या फोटोचा मुका घेतला. गाडी आता हायवेला लागली होती. त्याने घड्याळात पाहिले तर १२ वाजत आले होते, म्हणून त्याने गाडीचा वेग वाढविला. त्याला पुन्हा एकदा अनघाची आठवण आली. तो आठवणींच्या गावा गेला आणि तितक्यात ......


तितक्यात गाडी ठोकण्याचा आणि आर्त किंकाळ्यांचा आवाज घुमला. लक्षकच्या गाडीला मालवाहू ट्रक येऊन ठोकला होता. लक्षकला वेग कमी करता आला नाही आणि त्याचे डोके अनघाच्या फोटोसमोर आदळले. पळापळ झाली, पण उपयोग शून्य. लक्षक जागच्या जागी ठार झाला होता. त्या गाडीत लक्षक, अनघाचा फोटो आणि एका गाण्याचे बोल कानी पडत होते... " हमे तुमसे प्यार कितना, ये हम नहीं जानते... मगर जी नहीं सकते, तुम्हारे बिना... हमे तुमसे प्यार कितना..." अखेर लक्षक त्याच्या अनघाला भेटण्यासाठी

देवाघरी गेला. दुसऱ्या दिवशी पेपर मध्ये बातमी छापून आली, " हायवेवर प्रसिद्ध शायर लक्षक साने यांचे अपघाती निधन." नेत्रा अन आरव दोघांचीही मती कुंठित झाली होती. पण मिळालेल्या ह्या धक्क्यातून सावरणे सुद्धा तितकेच महत्वाचे होते, कारण "नक्ष" रुपी एक जबाबदारी त्या दोघांवर टाकून अनघा आणि लक्षकने त्यांचा अखेरचा निरोप घेतला होता. त्यामुळे हो-नाही करत करत अखेर ते दोघे या दुःखातून सावरून, नक्षच्या येणाऱ्या उज्ज्वल भविष्याच्या तयारीला लागले.

नियतीने असा एक डाव खेळला होता, ज्यामुळे चौघांचे जीवन एका कलाटणी मुळे बदलून गेले होते. अनघा आणि लक्षक स्वर्गवासी झाले, पण त्यांच्या प्रेमाचा अंश म्हणून "नक्ष"ला त्यांच्या डॅड आणि मम्मी कडे सोडून गेले होते. आणि नकळत का होईना, पण नियतीने नेत्रा आणि आरवलाही एकत्र आणले होते. आता घरात "दादू" आणि "आज्जी" म्हणून नक्ष त्यांना साद घालीत होता.

अनघा आणि लक्षक जरी या दोघांना सोडून गेले, तरी त्यांनी त्यांच्या रमण्याची आणि सुखाची तजवीज "नक्ष" सोबत

करून ठेवली होती. आजसुद्धा त्या दोघांना नक्षला खेळविताना, वाढविताना अनघा आणि लक्षकचे बालपण आणि त्यातल्या आठवणींमध्ये हरवून जावंसं वाटतं. नक्ष हळूहळू मोठा होत होता. नुकताच त्याच्या स्कुलमध्ये ड्रॉईंग कॉम्पिटीशन होती. आणि नक्षने काढलेल्या चित्राला पहिला नंबर देण्यात आला होता. नेत्रा आणि आरव या दोघांचीही मने नक्षने जिंकली होती. चित्रातून नक्षच्या मनातील या दोघांविषयीचा आदर, प्रेम सगळं उभरून दिसत होतं. या घटनेनंतर नेत्रा आणि आरव यांना "नक्ष"ला कुठे ठेवू अन कुठे नको, असं काहीसं झालं होतं.


Me
Grandpa
Grandma

***नियती... एक अशी गोष्ट, जी कोणाच्या हातात नसते. एखाद्याच्या जीवनात संधी देते तर एखाद्याला संकटात ओढून घेते. तिच्या तडाख्यातून कोणाची सुटका होणं शक्य नाही. म्हणूनच नियतीचा डाव कधी खोटा ठरणंही सोप्प नाही.***

*** समाप्त ***

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com